❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २७४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात

काँग्रेसचे राज्यभर आंदोलन

पुण्यातील कार्यकर्ते आक्रमक, ज्ञानेश कुमारांना तत्काळ पदावरून हटवण्याची मागणी



■ मुंबई (दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि निवडणूक आयोगाच्या एकूणच कारभारावर गंभीर आक्षेप घेत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने आज राज्यभर आक्रमक आंदोलन पुकारण्यात आले आहे. ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून तत्काळ हटवण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते आज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले असून, पुण्यासह राज्याच्या विविध जिल्ह्यांत जोरदार निदर्शने सुरू आहेत.

गेल्या काही दिवसांपासून ईव्हीएम, मतदार याद्यांमधील कथित गोंधळ आणि निवडणूक आयोगाच्या एकतर्फी वाटणाऱ्या भूमिकेवरून विरोधी पक्षांनी सातत्याने रान उठवले आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही नुकतीच निवडणूक आयोगावर आणि भाजपवर सडकून टीका केली होती. याच पार्श्वभूमीवर, निवडणुका निष्पक्ष वातावरणात पार पडाव्यात आणि लोकशाहीचे रक्षण व्हावे, यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांनी तत्काळ राजीनामा द्यावा किंवा त्यांना केंद्र सरकारने पदावरून दूर करावे, अशी आग्रही मागणी काँग्रेसने या आंदोलनातून केली आहे.

काँग्रेसच्या या राज्यव्यापी आंदोलनाचे तीव्र पडसाद पुण्यातही उमटत आहेत. पुणे शहर आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने आज रस्त्यावर उतरून निवडणूक आयोग आणि केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

पुण्यासोबतच मुंबई, नागपूर, अशा अनेक प्रमुख शहरांमध्ये काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त कार्यालयांसमोर निदर्शने केली जात आहेत. या ठिकाणी प्रशासनाला मागण्यांचे निवेदन दिले जात असून, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीत सुधारणा न झाल्यास हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही काँग्रेस नेत्यांनी दिला आहे.

विथ्या रामराजचा आशियाई स्पर्धेत धडाकेबाज पराक्रम, गुलवीर सिंगलाही रौप्यपदक

■ मुंबई (दै. संध्या)



2026 च्या आशियाई खेळांमध्ये भारतीय खेळाडूंचा डंका पाहायला मिळत आहे. सोमवारी 28 सप्टेंबर रोजी झालेल्या 1500 मीटर धावण्याच्या शर्यतीत भारताच्या गुलवीर सिंगने आपली सर्वोत्तम कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. तर दुसरीकडे महिला धावपटू विथ्या रामराजने 400 मीटर अडथळा शर्यतीत कांस्यपदक जिंकून इतिहास रचला आहे. विथ्याने भारताच्या दिग्गज धावपटू पीटी उषा यांचा तब्बल 42 वर्षांपूर्वीचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत क्रीडा जगताला थक्क केले आहे.

विथ्या आणि गुलवीर यांच्या या धमाकेदार कामगिरीमुळे आशियाई खेळांमधील भारताच्या पदकांची संख्या आता 40 च्या पार पोहोचली असून देशभरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महिलांच्या 400 मीटर अडथळा शर्यतीत विथ्या रामराजने अवघ्या 54.75 सेकंदात शर्यत पूर्ण केली. ही तिची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी ठरली. या कामगिरीसह तिने 1984 च्या लॉस एंजिल्स ऑलिंपिकमध्ये पीटी उषा यांनी नोंदवलेला 55.42 सेकंदांचा 42 वर्षे जुना राष्ट्रीय विक्रम इतिहासजमा केला. आता हा राष्ट्रीय विक्रम अधिकृतपणे विथ्या रामराजच्या नावावर नोंदवला गेला आहे.

या स्पर्धेत संयुक्त अरब अमिरातीच्या मरियम करीमने 54.31 सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले, तर कझाकस्तानच्या एडेलिना जेम्सने 54.58 सेकंद वेळ घेत रौप्यपदकावर कब्जा केला. चालू आशियाई खेळांमधील विथ्या रामराजचे हे दुसरे पदक आहे. याआधी तिने 4x400 मीटर मिक्स रिले संघात रौप्यपदक जिंकले होते.

पुरुषांच्या 1500 मीटर रेसमध्ये गुलवीर सिंगने 3:36.72 मिनिटांत शर्यत पूर्ण करून आपले वैयक्तिक सर्वोत्तम टायमिंग नोंदवले आणि रौप्यपदक मिळवले. या शर्यतीत जपानच्या कजुतो इइजावाने 3:36.35 मिनिटांत रेस पूर्ण करत सुवर्णपदक जिंकले, तर जपानच्याच नागिया मोरीने 3:37.92 मिनिटांच्या वेळेसह कांस्यपदक मिळवले. गुलवीर सिंगचे या आशियाई खेळांमधील हे दुसरे पदक आहे. यापूर्वी गेल्या शुक्रवारी त्याने पुरुषांच्या 10000 मीटर रेसमध्ये 28:29.38 मिनिटांची वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले होते.

थोडक्यात...

50 जणांना विषबाधा; दादा भुसेंकडून पाहणी

नाशिक : दैनिक संध्या

मालेगाव तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथे आठवडे बाजारात एका दुकानदाराकडून भेळ-भत्ता खाल्ल्याने 50 पेक्षा जास्त नागरिकांना विषबाधा झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे. विषबाधा झालेल्यांमध्ये लहान मुलांचाही मोठ्या प्रमाणावर समावेश असून सर्वांना मालेगावच्या सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती मिळताच राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तातडीने सामान्य रुग्णालयात धाव घेत रुग्णांची भेट घेतली आणि परिस्थितीचा आढावा घेतला. नांदगाव बुद्रुक गावात भरलेल्या आठवडे बाजारात खरेदीसाठी आलेल्या अनेक ग्रामस्थांनी एका स्थानिक विक्रेत्याकडून भेळ-भत्ता विकत घेऊन खाल्ला होता. मात्र, त्यानंतर काही वेळातच नागरिकांना मळमळ, जुलाब आणि उलट्यांचा तीव्र त्रास सुरू झाला. एकाच वेळी अनेकांना, विशेषतः लहान मुलांना त्रास होऊ लागल्याने गावात मोठी घबराट पसरली.

उज्जैनमध्ये मशीद पाडण्याविरोधातील याचिका रद्द

उज्जैन : दैनिक संध्या

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने उज्जैनमधील शाही मशीद प्रकरणात दाखल केलेली याचिका फेटाळून लावली आहे. सर्व पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर, जिल्हा प्रशासन आणि शाही मशीद समिती यांच्यात झालेल्या करारानुसार न्यायालयाने हे प्रकरण निकाली काढले. याचिकाकर्ते, शाही मशीद समितीचे प्रतिनिधित्व करणारे वकील कुलदीप पाठक यांनी सांगितले की, समिती आणि प्रशासन यांच्यातील करारानुसार रस्त्यावर ३ फूट जागा सोडून काही दुकाने हटवण्यास सहमती झाली आहे. मोठी मिनार स्थलांतरित केला जाईल आणि दुकानांसाठी दुसरी जागा दिली जाईल. यापूर्वी, सोमवारी सकाळी, मशिदीचा काही भाग पाडल्याप्रकरणी मोठा गदारोळ झाला होता. पोलिसांवर दगडफेक करण्यात आली, ज्यामुळे लाठीचार्ज आणि अश्रुधूर सोडण्यात आला. जमावाला पांगवण्याचा प्रयत्न करताना महिला पोलीस ठाणेदार जखमी झाल्या. या वादानंतर अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली, परंतु दुपारपर्यंत पुन्हा दगडफेक सुरू झाली. पोलिसांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर केला. गोंधळातही ही कारवाई सुरू होती, परंतु नमाजाच्या वेळी ती थांबवण्यात आली. त्यानंतर परिस्थिती शांत झाली. पोलिसांनी १५ जणांना ताब्यात घेतले आहे. वातावरण बिघडवल्याच्या आरोपाखाली सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्ससह सात जणांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. सिंहास्थ प्रकल्पांतर्गत, उज्जैनमधील कांतल चौक ते गोपाल मंदिरापर्यंतचा १.५ किलोमीटरचा रस्ता १५ मीटरपर्यंत रुंद केला जाईल.

आपण कुठेही आणि कुणासोबतही जाणार नाही, यायचं असेल तर आमच्यासोबत या - शरद पवार

■ मुंबई (दै. संध्या)



गेल्या अनेक महिन्यांपासून राजकीय वर्तुळात शरद पवार हे भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएसोबत जाणार अशा चर्चा रंगल्या होत्या. मध्यंतरी पंतप्रधान मोदी यांच्याशी भेट झाल्यामुळे या चर्चांना आणखीनच हवा मिळाली होती. मात्र, सोमवारी मुंबईत पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यात शरद पवार यांनी आपण एनडीएसोबत जाणार नसल्याचे स्पष्ट केले. त्यासोबतच शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री आणि अजित पवार गटाच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवार यांना अप्रत्यक्षरित्या संदेश दिला. आपल्याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. हो, चर्चा सुरू आहे. मला त्यांना सांगायचं आहे. आपण कुठेही जाणार नाही. आम्ही कुणासोबत जाणार नाही. यायचं असेल तर आमच्यासोबत या, असे शरद पवार यांनी सांगितले. त्यामुळे आगामी काळात शरद पवार यांचा पक्ष राज्यात महाविकास आघाडी आणि देशपातळीवर इंडिया आघाडीसोबत राहून काम करेल, हे स्पष्ट झाले आहे.

मध्यंतरी शरद पवार हे भाजपसोबत हातमिळवणी करुन एनडीए आघाडीत सामील होतील, अशी जोरदार चर्चा होती. त्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलिनीकरण होईल, अशीही वदंता होती. मात्र, शरद पवार यांनी या सर्व शक्यता पार धुडकावून लावल्या आहेत. शरद पवार यांनी आज पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीतील चर्चेविषयीही माहिती दिली. आम्ही अडीच तास एकत्र बसलो आहोत. मला अनेक वेगवेगळ्या मागण्या दुष्काळाच्या निमित्ताने ऐकायला मिळाल्या. प्रांताध्यक्ष यांनी सूचना दिल्यानुसार आपण काय निवेदन आंदोलन करताना द्यायचे आहे, हे सांगितलं आहे. रविवारी कोअर कमिटी बैठक आम्ही घेतली. राज्य सरकारने काय काय देणे अपेक्षित आहे त्याचे निवेदन दिलं आहे. आम्ही दोन चार दिवसांत सरकारकडे याबाबत आग्रह करू. आपल्याला भांडण करायचं नाही जर मागण्या मान्य झाल्या नाहीत तर रस्त्यावर उतरून संघर्ष करु, असे शरद पवार यांनी म्हटले.

महाराष्ट्राचा 'दुष्काळ' दिल्लीत चर्चेत; केंद्रीय कृषीमंत्री पथकासह पाहणीस येणार, तारीख ठरली

■ मुंबई (दै. संध्या)



राज्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह अनेक मंत्र्यांनी दुष्काळ पाहणी दौरा केला असून मराठवाड्यासह, विदर्भात पाऊस नसल्याने भीषण परिस्थिती ओढवली आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या अहवालानुसार ट्रीगर 1 परिस्थिती असलेल्या राज्यातील 256 तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार, येथील शेतकऱ्यांना आणि नागरिकांना काही सोयी-सुविधा देण्यात येत आहेत. एकीकडे राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरीही महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनेही परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. त्याच, पार्श्वभूमीवर केंद्राचे पथकही दुष्काळ पाहणीसाठी महाराष्ट्रात येत आहे.

दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह राज्याचा दौरा करणार असल्याची माहिती त्यांनी नवी दिल्लीतील पुसा येथील राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान 2026 च्या उद्घाटन सत्रात दिली. 3 ऑक्टोबर नंतर केंद्रीय पथक महाराष्ट्रात दौरा करणार असल्याचे समजते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन हे उपलब्ध पाण्याचा ताळेबंद, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता लक्षात घेऊन करण्याचे आवाहन केंद्रीय मंत्री चौहान यांनी केले. पाणीटंचाई असलेल्या भागात कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. धान कापणीनंतर रिकाम्या राहणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या पिकांची लागवड वाढविण्यावर भर देण्यात आला.

रब्बी हंगामासाठी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांचा आगाऊ आराखडा तयार ठेवण्याच्या तसेच शेतकऱ्यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. खतांचा संतुलित वापर करण्यासाठी 'खेत बचाओ' अभियान रब्बी हंगामातही राबविण्यात यावे, असे चौहान यांनी सांगितले. तसेच फार्मर आयडी, एग्रीस्टॅक आणि किसान क्रेडिट कार्डचे कव्हरेज वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सहकाऱ्यांच्या दबावातून चौकशा, पण शरण येणार नाही; जरांगेंचा सरकारला इशारा

■ जालना (दै. संध्या)



'माझ्याविरोधात मोठे षडयंत्र सुरू आहे. मला बदनाम करणे सुरू आहे. माझ्याविरोधात अफवा पसरवल्या जात आहेत. सावध राहा. रात्र वैऱ्याची आहे. नोटीस देण्यात आल्या आहेत. दबावातून चौकशा सुरू आहेत, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी आज केला.

मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्याविरोधात कारवाई केल्याचे समोर आले आहे. त्यानंतर जरांगे यांनी पत्रकार परिषद घेत विविध मुद्यांवर सविस्तर म्हणणे मांडले.

जरांगे म्हणाले, 'मला खूप एकटे पाडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्रास देणे सुरू आहे. मात्र, हे समाजासाठी भोगायला मी तयार आहे. मी थांबणार नाही. हटणार नाही. ही वादळापूर्वीची शांतता आहे. ते आमचा जेवढा बदला घेतील, तेवढाच बदला आम्हीही घेऊ,' असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. 'आपण या साऱ्यांचे धागेदोरे शोधलेत. ते पुराव्यासह मांडू. सरकारला तीन महिन्यांचा वेळ दिलाय. तुम्ही वार करा. आम्ही पेटून उठू. मात्र, तुमच्याशी मित्रत्व करणार नाही. तुम्हाला शरण येणार नाही. तुरुंगात जावू. मेलो तरी चालेल. मात्र, मराठ्यांना तुमच्या दावणीला बांधणार नाही,' अशा इशाराही त्यांनी दिला.

सरकारने जर तीन महिन्यांच्या आत आमच्या मागण्या मान्य केल्या, तर ठीक आहे; पण जर मागण्या मान्य केल्या नाहीत, तर याचा अर्थ असा होईल की, सत्तेत येण्यासाठी तुम्हाला मराठा समाजाची मते हवी आहेत आणि अन्याय मात्र मराठा समाजावर करायचा आहे. समाजाची अशी फसवणूक सहन केली जाणार नाही. माझ्याविरोधात षड्यंत्र रचले तरी काहीही साध्य होणार नाही, मी मागे हटणार नाही. तसेच, विद्यार्थ्यांची 'व्हॅलिडिटी' थांबवून ठेवू नका, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, मराठा समाजासाठी सरकारने जो 'ओबीसी जीआर' काढला आहे, त्याची अंमलबजावणी हसन मुश्रीफ यांच्यासह कृषी आणि रोजगार व कौशल्य विकास यांसारख्या अनेक मंत्र्यांच्या खात्यांमध्ये झालेली नाही. कोणी नेता काहीतरी सांगतो म्हणून मराठा समाजाचा अवमान करू नका, हे तुम्हाला पुढे महागात पडेल, असा इशारा त्यांनी दिला. ओबीसींच्या ज्या सवलती लागू केल्या आहेत, त्या खरोखर कशा दिल्या जातात, याची माहिती घेतली पाहिजे. एसीबीसीच्या (SEBC) आरक्षणाला धक्का लागणार नाही, असे सरकारने मला सांगितले आहे. मी जितका शांत राहील, तितकी जास्त माहिती मला मिळत जाईल.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, यंदाच्या दसरा मेळाव्याला सर्व समाजबांधवांनी गडावर दर्शनासाठी आले पाहिजे. मात्र, दुष्काळाची परिस्थिती पाहता आपण यंदा हा मेळावा छोट्या स्वरूपात घेऊ," असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सरकारने विशेष अधिकार द्यावे

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा समाजाला वारंवार धोका द्यायचा आणि केवळ भूलथापा मारण्याचे काम सरकारने करू नये. तुमचे लोक आणि काही सरकारी अधिकारी काम करत नाहीत; म्हणूनच आम्ही आता मोडी अभ्यासक पुढे करत आहोत, जे काम करायला पूर्णपणे तयार आहेत. मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात जुन्या नोंदी शोधण्याची त्यांची तयारी आहे. फक्त त्यांना सरकारच्या वतीने विशेष अधिकार देण्यात यावेत आणि त्यांच्या कामात कुठेही अडथळा आणला जाऊ नये. यासह महाराष्ट्रात विलीन होत असताना मराठवाड्याला आरक्षण होते. ते घाईगडबडीत देण्यात आले नाही, तर जुन्या गॅझेटच्या आधारावर मराठ्यांना आरक्षण देण्याचा सुधारित जीआर काढावा. आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत. मराठा आरक्षण आंदोलनात ज्यांनी बलिदान दिले, त्या कुटुंबियांचे हाल करू नका. समाजाच्या डोळ्यात आलेले अश्रू पुसले नाही तर हे आंदोलन आणखी भयानक रूप घेऊ शकते. बलिदान दिलेल्या कुटुंबियांना सरसकट नोकरी आणि आर्थिक मदत द्यावी. 'अनुभूती' किंवा 'अनुकंपा' या शब्दांवर चालढकल न करता सर्व आवश्यक जीआर सरकारने तातडीने काढावेत.

सरकारनेही ठोस पावले उचलली नाहीत

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी उपसमितीकडून 30 मोडी अभ्यासक नेमण्यात आले होते. मी त्यांच्याशी चर्चा केली, तेव्हा एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, त्यांनी कोणतेही रेकॉर्ड शोधलेले नाही. त्यांना केवळ नावापुरते नेमण्यात आले होते आणि कोणतेही अधिकारी त्यांना रेकॉर्ड तपासू देत नव्हते. सरकारनेही या प्रकरणात काही ठोस पावले उचलली नाहीत, असे त्या अभ्यासकांनी मला सांगितले.

महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन

■ नारायणगाव(दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातून प्रस्तावित कल्याण–लातूर जनकल्याण महामार्गाला बाधित होणाऱ्या १६ गावांतील शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या महामार्गामुळे शेतजमिनी, घरे, विहिरी, बोअरवेल, फळबागा तसेच उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त करत शेतकरी व नागरिकांनी बुधवारपासून बनकरफाटा येथे धरणे आंदोलन सुरू केले आहे.

'लातूर जनकल्याण मार्ग हटवा, शेतकरी वाचवा' आणि 'जुन्नर तालुक्यातून हा मार्ग नकोच' अशा घोषणांसह आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. प्रस्तावित महामार्गाच्या मार्गातून जुन्नर तालुका वगळण्याची मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

माजी आमदार बाळासाहेब दांगट यांच्या नेतृत्वाखाली बाधित गावांतील शेतकऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रशासनाकडे निवेदने देणे, प्रकल्पासंदर्भातील अधिकृत कागदपत्रे मागविणे तसेच गरज भासल्यास कायदेशीर मार्गाचा अवलंब करण्याची भूमिका समितीने घेतली आहे. या प्रकल्पामुळे शेती, पर्यावरण, जलस्रोत



आणि स्थानिक जीवनपद्धतीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा अभ्यास करून शेतकऱ्यांची बाजू शासनासमोर मांडण्यात येणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले. दरम्यान, तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात प्रस्तावित महामार्ग रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. महामार्गाच्या प्रस्तावित मार्गरेषेमुळे कोणत्या गावांतील किती जमीन बाधित होणार, किती शेतकऱ्यांवर परिणाम होण्याची शक्यता आहे आणि प्रकल्पाची सध्याची प्रशासकीय स्थिती काय आहे, याबाबत अधिकृत माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. अंतिम संरेखन नकाशा, बाधित क्षेत्राचा तपशील आणि भूसंपादन प्रक्रियेची सद्यस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली.

प्रस्तावित कल्याण–लातूर महामार्गाची लांबी सुमारे ४५० किलोमीटर असून तो ठाणे, पुणे, अहिल्यानगर, बीड, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतून जाण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे. महामार्गाचे संरेखन अंतिम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे जुन्नर तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांकडून शासनाच्या अधिकृत निर्णयाची आणि मार्गरेषेची माहिती मागविण्यात येत आहे.

शेतकरी नेते अंबादास हांडे यांनी जुन्नर तालुक्यातील यापूर्वीच्या तसेच प्रस्तावित पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे शेतजमिनींवर झालेल्या किंवा होणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधले. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी, महामार्गाच्या मार्गरेषेचा पुनर्विचार करावा आणि शक्य असल्यास पर्यायी मार्गाचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच माजी आमदार अतुल बेनके यांनी बाधित शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळासह जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतल्याचे सांगण्यात आले. प्रकल्पाची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच एमएसआरडीसीचे प्रमुख अनिल गायकवाड यांच्यासोबत बैठक घेण्याचा प्रयत्न केला जाणार असून, या बैठकीत सर्वपक्षीय प्रतिनिधी आणि बाधित शेतकऱ्यांची भूमिका मांडण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. या महामार्गाच्या संभाव्य मार्गात तळेरान, मढ, पारगाव, सीतेवाडी, बगाडवाडी, वाटखळ, कोळवाडी, कोल्हेवाडी, सांगणारे, कोटमवाडी, पिंपळगाव जोगा, डिंगोरे, उदापूर, अहिनवेवाडी, ओतूर आणि रोहोकडी या गावांतील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. तसेच या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बनकरफाटा येथे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील आणि सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस यंत्रणा तैनात करण्यात आली. या आंदोलनात माजी आमदार अतुल बेनके, बाळासाहेब दांगट, माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले, मंदाकिनी दांगट, बापूसाहेब कुमकर, अंबादास हांडे, देवराम लांडे, सुरज वाजगे, शिवशंकर घोलप, अमोल घोलप, भगवान घोलप, ईश्वर केदारी, बबन तांबे, पंकज हांडे, सचिन घोलप, संतोष घोटणे, विकास राऊत, पंकज घोलप, विनोद केदारी, निलेश घोलप, दत्तात्रय डुंबरे ,रामदास घोलप यांच्यासह शेतकरी व महिला उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



आळेफाटा बाजारात गाईंच्या खरेदी-विक्रीतून ७५ लाखांची उलाढाल

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारात गुरुवारी भरलेल्या गाईंच्या बाजारात मोठी आवक पाहायला मिळाली. या बाजारात शेतकऱ्यांनी आणि पशुपालकांनी मोठ्या संख्येने आपल्या गाई विक्रीसाठी आणल्या होत्या, ज्यामुळे खरेदी-विक्रीच्या व्यवहारांना मोठी गती मिळाली. या दिवशी बाजारात एकूण ३७८ गाईंची आवक झाली होती, ज्यापैकी ३२७ गाईंची यशस्वी विक्री झाली. या संपूर्ण खरेदी-विक्रीच्या माध्यमातून बाजारात तब्बल ७५ लाख ३१ हजार ९०० रुपयांची मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. या बाजारात गायींना ५ हजार रुपयांपासून ते १ लाख १८ हजार रुपयांपर्यंत चांगला भाव मिळाला. बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे व सतीश मस्करे यांनी या मोठ्या आवकेची सविस्तर माहिती दिली. तसेच, बाजार समितीचे सभापती ॲड. संजय शिवाजीराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली या संपूर्ण बाजाराचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते. आळेफाटा येथील या उपबाजार आवारात दर गुरुवारी सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत हा गाईंचा बाजार भरवला जातो. परिसरातील पशुपालक आणि शेतकऱ्यांसाठी जनावरांच्या खरेदी-विक्रीकरता ही एक अत्यंत महत्त्वाची आणि हक्काची बाजारपेठ ठरत आहे.

भरदिवसा बिबट्याचा शेळीवर हल्ला!

कवठे येमाई : दैनिक संध्या



शिरूर तालुक्यातील कवठे येमाईच्या रोहिलेवाडी परिसरात मोठ्या बिबट्याची दहशत निर्माण झाली असून भरदिवसा शेळीवर हल्ला केल्याने शेतकरी व शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे शेतात १० ते १५ मजूर बाजरी काढण्याचे काम करीत असतानाच ही घटना घडल्याने काही काळ एकच धावपळ उडाली. रोहिलेवाडी परिसरात सध्या बाजरी काढण्याचे काम सुरू आहे. दोन शेतांच्या मधील मोकळ्या जागेत बांधलेल्या मोठ्या शेळीवर अचानक बिबट्याने झडप मारली. शेळीला जबड्यात पकडून बिबट्या तिला जवळच्या उसाच्या शेतात घेऊन गेला. हा प्रकार पाहताच महिला,शेतमजुरांनी आरडाओरड करत उसाच्या शेताकडे धाव घेतली. मजुरांची चाहूल लागताच बिबट्याने शेळी सोडून तेथून धूम ठोकली. दरम्यान, मजुरांनी जखमी शेळीला बिबट्याच्या तावडीतून बाहेर काढले. बिबट्याच्या हल्ल्यात शेळीच्या जबड्याला गंभीर जखमा झाल्या असून शेतकरी महिला व मजुरांनी तातडीने डॉक्टरांना बोलावून शेळी वर औषधोपचार केले. मात्र, तिची प्रकृती गंभीर असल्याने ती वाचेल की नाही, याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. "बिबट्या आकाराने मोठा असून दिवसाढवळ्या त्याचे दर्शन होत आहे. त्यामुळे शेतात काम करणाऱ्या नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे," अशी चिंता ज्येष्ठ शेतकरी छबनराव रोहिले यांनी व्यक्त केली. रोहिलेवाडी परिसरात बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये कमालीची दहशत आहे.



गुरुकुल विद्यालयात अत्याधुनिक स्टीम लॅब व संगणक लॅबचे उद्घाटन

सासवड : दैनिक संध्या

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित गुरुकुल प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व तांत्रिक विकासाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक स्टीम लॅब व संगणक लॅबचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा तसेच सासवड नगरीच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. फायझर, युनायटेड वे मुंबई आणि एक्सपेरिफन या कंपन्यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या दहा लाख रुपयांच्या सीएसआर निधीतून स्टीम लॅबची उभारणी करण्यात आली आहे. या स्टीम लॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित (STEM) या विषयांचे ज्ञान प्रत्यक्ष प्रयोग, विविध प्रकल्प व कृतीआधारित उपक्रमांच्या माध्यमातून घेता येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनासोबतच सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि तांत्रिक कौशल्यांचा विकास होण्यास मदत होणार आहे. यावेळी विद्यालयातील अत्याधुनिक संगणक लॅबचेही उद्घाटन करण्यात आले. संगणक व डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तसेच स्व. एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना १,००० वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त शरदचंद्र आबा जगताप, फायझर कंपनीचे वरिष्ठ संचालक सचिन वाकणकर, युनायटेड वे मुंबईच्या सारा खोकावाला, स्व. एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, डॉ. सुमित काकडे, मनोजकुमार वाकचौरे, परेश पाटील, शुभम दारिया, सूर्या बोधला, स्वाती दुर्गाशरण तसेच एक्सपेरिफनचे पदाधिकारी उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार हाके यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्रीमती विद्या कारंडे यांनी सूत्रसंचालन केले, तर भोई उमेश यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

चाकणला ढोल ताशांच्या गजरात गणरायाचे विसर्जन

शिस्तबद्ध वातावरणात पार पडली मिरवणूक

■ चाकण (दै. संध्या)

ढोल ताशांचा जल्लोष, वाद्य वृंदांचा गजर, फुलांच्या प्रचंड पाकळ्या उधळून दिमाखात काढण्यात आलेल्या मिरवणूकांच्या माध्यमातून चाकणला गणरायाचे शांततेत व उत्साहात विसर्जन करण्यात आले.

चाकण शहर व परिसरात गणेश विसर्जन मिरवणूक अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात निर्विघ्नपणे पार पडली. विसर्जन मिरवणुकी दरम्यान महात्मा फुले मित्र मंडळाच्या वतीने गटनेते नितीन गोरे व उद्योजक विकास गोरे यांच्या हस्ते शहरात दाखल झालेल्या विविध ढोल- ताशा पथकांचे तसेच स्थानिक मित्र मंडळांचे सन्मानपूर्वक स्वागत करण्यात आले.

यावेळी मंडळाच्या वतीने सर्व पथकांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेविका सुवर्णा राक्षे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेवक मंगेश कांडगे, शशिकांत जाधव, स्मिता जाधव, साहेबराव कड, एड. वर्षा शेवकरी आदींसह नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक, नगरसेविका व मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नगराध्यक्षांनी वाजवला ढोल

चाकण मधील गणरायाच्या मिरवणुकीचा उत्साह वाढवत नगराध्यक्षा मनीषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांनी स्वतः पुढाकार घेत ढोल वाजवला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला."

चाकणला पर्यावरणपूरक विसर्जनावर भर

" भाम नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी चाकण नगरपरिषदेच्या वतीने विशेष दक्षता घेण्यात आली होती. नदीचे पाणी दूषित होऊ नये यासाठी नदी पात्रात थेट गणेशमूर्ती विसर्जन करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली होती. नियमांचे उल्लंघन होऊ नये म्हणून नदीकाठी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता."

कृत्रीम तलावाची उभारणी

" नागरिकांची सोय व्हावी यासाठी नगरपरिषदेच्या वतीने चाकण येथील भाम नदी परिसरात कृत्रिम तलावाची उभारणी करण्यात आली होती. तसेच चाकण नगरपरिषदेतर्फे प्रभागनिहाय गणेशमूर्ती संकलन कक्ष राबविण्यात आले होते.

२२ वर्षे प्रलंबित फौजदारी अपीलाचा निकाल; आरोपीची निर्दोष मुक्तता



■ जुन्नर (दै. संध्या)

जुन्नर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. श्री. एस. बी. शेलार यांनी सुमारे २२ वर्षे न्याय प्रलंबित असलेल्या फौजदारी अपिलाची जलदगतीने सुनावणी पूर्ण करून व निकाल देऊन ,आरोपी राजू इब्राहिम इनामदार यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश पारित केला आहे. त्यांचे या न्यायालयीन कामकाजातील जलदगती बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

राजू इब्राहिम इनामदार यांच्याविरुद्ध नारायणगाव पोलीस ठाण्यात सन २००० मध्ये भारतीय दंड विधान (भा.दं.वि.) कलम ३९२ अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक १८५/२००० हा दाखल करण्यात आला व नारायणगाव पोलिसांकडून गुन्ह्याचे दोषारोप पत्र जुन्नर येथील फौजदारी न्यायालयात दाखल करण्यात आले. न्यायालयाने गुन्ह्यातील एकूण सहा साक्षीदार तपासून ,आरोपी राजू इब्राहिम इनामदार यांना तीन वर्षे सश्रम कारावास व रुपये ५,००० द्रव्यदंडाची शिक्षा सुनावली.

जुन्नर येथील फौजदारी न्यायालयाचे सदर निर्णयाविरुद्ध आरोपीने सन २००४ मध्ये पुणे येथील सत्र न्यायालयात अपील दाखल केले. सदर अपील न्याय प्रलंबित असताना ते राजगुरुनगर येथील सत्र न्यायालयात वर्ग करण्यात आले. व त्यानंतर जुन्नर येथे सत्र न्यायालयाची स्थापना झाल्याने सदर फौजदारी अपील जुन्नर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. श्री. एस. बी. शेलार यांच्या न्यायालयात वर्ग करण्यात आले.

जुन्नर येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश मा. श्री. एस. बी. शेलार यांनी सुमारे २२ वर्षे न्याय प्रलंबित असलेल्या सदरील फौजदारी अपिलाची जलदगतीने सुनावणी घेऊन व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेऊन, तपास व खटला चालविताना नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्ष, व जप्त मुद्देमाला संदर्भातील कागदपत्रे, सरतपास व उलटतपास यांचे सखोल परीक्षण करून, साक्षीदार व पंचांचे जबाब विश्वासार्ह नसल्याचे तसेच फिर्यादीने वर्णन केलेल्या मुद्देमालाबाबत तफावत आढळून येत असल्याचे निरीक्षण नोंदविले. व आरोपी राजू इब्राहिम इनामदार यांची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश पारित केला. याप्रकरणी आरोपीच्या वतीने मा. सत्र न्यायालयाने लिगल एडमार्फत नियुक्त केलेले ॲड. किरण सुधीर मते यांनी सदर फौजदारी अपील चालवून प्रभावी युक्तिवाद केला. सरकार पक्षातर्फे ॲड. गोकुळ के. खोडे यांनी कामकाज पाहिले.

आळेफाटा बस स्थानकात प्रवाशांची सुरक्षा रामभरोसे

■ नारायणगाव (दै. संध्या)

पुणे-नाशिक आणि कल्याण-अहमदनगर या दोन महत्त्वाच्या महामार्गांचे केंद्रबिंदू असलेल्या आळेफाटा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बस स्थानकात प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर कोंडी होत आहे. येथील अधिकृत चौकशी कक्ष संध्याकाळीच 6.30 वाजता च कुलूपबंद केला जात असून, रात्रीच्या वेळी संपूर्ण बस स्थानक परिसर मद्यपी आणि संशयास्पद चोरट्यांचा अड्डा बनत चालला आहे.या गंभीर प्रकारामुळे प्रवाशांमधून, विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आळेफाटा हे २४ तास वाहते आणि महत्त्वाचे जंक्शन असल्याने या ठिकाणी रात्री-अपरात्री शेकडो प्रवाशांची ये-जा सुरू असते. मात्र, येथील एसटी प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे रात्री येणाऱ्या प्रवाशांना हक्काची माहिती मिळणेही कठीण झाले आहे.

येथील चौकशी कक्ष संध्याकाळी लवकरच बंद केला जातो. त्यामुळे संध्याकाळी व रात्रीच्या वेळी कोणती बस कधी येणार, कुठली गाडी रद्द झाली आहे की सुरू आहे, याची कोणतीही माहिती प्रवाशांना मिळत नाही. डिजिटल फलक नसल्याने प्रवाशांना तासनतास ताटकळत राहावे लागते.चौकशी कक्ष बंद झाल्यानंतर या परिसरात प्रवाशांना मदतीसाठी कोणीही उपलब्ध नसते. याचाच गैरफायदा घेत रात्रीच्या वेळी बस स्थानक परिसरात



मद्यपी, गर्दुल्ल्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढतो. प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. सुरक्षा रक्षकांचा थांगपत्ता नसल्याने प्रवाशांना स्वतःच्या जीवाची आणि साहित्याची भीती बाळगत प्रवास करावा लागत आहे.

आळेफाटा हे मुख्य केंद्र असतानाही येथील चौकशी कक्ष रात्री लवकर बंद करणे चुकीचे आहे. रात्रीच्या वेळी महिला प्रवाशांना येथे थांबणे असुरक्षित वाटते. प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन सुरक्षा वाढवावी,अशी मागणी स्थानिक नागरिक आणि प्रवाशांनी केली आहे. एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन आळेफाटा येथील चौकशी कक्ष रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवावा आणि स्थानिक पोलिसांनी प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बस स्थानक परिसरात रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे



आंबेगाव बुद्रुक नऱ्हे येथे तिसरे हब केले सुरू

पुणे : दैनिक संध्या

कार्स२४ ने आंबेगाव बुद्रुक नऱ्हे येथे पुण्यातील आपले तिसरे हब सुरू केले आहे. या हबमुळे दक्षिण पुण्यातील ग्राहकांना आवडती गाडी जवळून पाहणे, टेस्ट ड्राइव्ह घेणे आणि खरेदीचा निर्णय घेण्यापूर्वी टीमशी बोलणे अधिक सोयीचे होईल. कार्स२४ च्या आकडेवारीनुसार, वापरलेल्या कारांच्या मागणीमध्ये महाराष्ट्राचा वाटा २०२४ मधील १६.४ टक्क्यांवरून २०२५ मध्ये २०.१ टक्क्यांपर्यंत वाढला. पुण्यातील तिसऱ्या हबच्या माध्यमातून कंपनी शहरातील अधिक ग्राहकांपर्यंत आपल्या सेवा पोहोचवत आहे. आज अनेक ग्राहक गाडीचा शोध ऑनलाइन सुरू करतात. मात्र खरेदी करण्यापूर्वी त्यांना गाडी प्रत्यक्ष पाहायची आणि चालवून पाहायची असते. नव्या हबमध्ये ग्राहक उपलब्ध गाड्या पाहू शकतील आणि टेस्ट ड्राइव्ह घेऊ शकतील. फायनान्सिंग आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेतही कार्स२४ ची टीम त्यांना मदत करेल. ग्राहक ऑनलाइन शोध सुरू करून पुढील प्रक्रिया हबमध्ये पूर्ण करू शकतील. विक्रम चोप्रा, संस्थापक आणि ग्रुप सीईओ, कार्स२४ म्हणाले, "गाडी खरेदी करताना ऑनलाइन मिळणारी माहिती उपयोगी ठरते. पण अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अनेक ग्राहकांना गाडी प्रत्यक्ष पाहायची असते. पुण्यातील आमचे तिसरे हब ही सुविधा आणखी ग्राहकांच्या जवळ घेऊन येईल. इथे त्यांना गाडी पाहता येईल, प्रश्न विचारता येतील आणि संपूर्ण माहिती घेऊन निर्णय घेता येईल."

हटके म्युझिक ग्रुपतर्फे 'हटके स्वामी वंदना' संगीत मैफल

पुणे : दैनिक संध्या

हटके म्युझिक ग्रुपतर्फे स्वामी भक्तांसाठी 'हटके स्वामी वंदना' या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गीत-संगीतकार संतोष अत्रे यांनी रचलेल्या व संगीतबद्ध केलेल्या १० नवीन रचनांचे सादरीकरण या मैफलीत करण्यात येणार आहे. रविवारी २७ सप्टेंबर सायंकाळी ६ वाजता वेळेत सदाशिव पेठेतील भारत इतिहास संशोधन मंडळाच्या राजवाडे हॉल मध्ये हा कार्यक्रम होणार आहे. नाट्यकर्मी मोहन जोशी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. संतोष अत्रे यांच्यासह गायक राहुल जोशी, धवल चांदवडकर, गायिका रश्मी मोघे, अनुश्री घोरपडे तसेच हटके म्युझिक ग्रुपचे सदस्य रचनांचे सादरीकरण करणार आहेत.

सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने 'रानभाजी महोत्सव' उत्साहात संपन्न

पुणे: दैनिक संध्या

सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, कृषी विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC), वन धन केंद्र आणि ऋषिकेश परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने माळशेज घाट परिसरात 'रानभाजी महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले.पारंपरिक रानभाज्यांचे महत्त्व आणि त्याचे ज्ञान स्थानिक पर्यटकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आदिवासी बांधव व महिला बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरला आहे. माळशेज घाटाच्या निसर्गरम्य वातावरणात भरविण्यात आलेल्या या महोत्सवाचा मुख्य उद्देश पारंपरिक रानभाज्या, आदिवासी खाद्यसंस्कृती आणि स्थानिक उत्पादनांचे संवर्धन करणे हा होता. महोत्सवात ३५ ते ४० प्रकारच्या विविध, दुर्मिळ आणि पौष्टिक रानभाज्यांचे स्टॉल्स उभारण्यात आले होते. स्थानिक पंचक्रोशीतील ग्रामस्थांसह माळशेज घाटात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनी महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पर्यटकांनी विविध रानभाज्यांची माहिती जाणून घेत खरेदी केली. या महोत्सवाच्या माध्यमातून केवळ पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे दर्शन न घडविता आदिवासी महिला लाभार्थी आणि स्थानिक महिला बचत गटांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहितीही देण्यात आली. त्यामुळे महिला सक्षमीकरणासह स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास या उपक्रमाची मदत झाली. स्थानिक रानभाज्यांना बाजारपेठ, आदिवासी खाद्यसंस्कृतीला व्यासपीठ आणि महिला बचत गटांना रोजगाराची संधी देणारा हा उपक्रम माळशेज घाटातील पर्यटकांसाठीही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. महोत्सवाला राज्यपाल नियुक्त सल्लागार ॲड. किरण गभाले, पुणे जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती तुळशीराम भोईर, युवराज लांडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे विष्णू गाडेकर, शंकर अण्णा कुमकर, ऋषिकेश परिवाराचे अध्यक्ष सुरेश जोशी, खूबीचे सरपंच श्री. काटे, पारगावचे उपसरपंच विनायक चकवे यांच्यासह एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महात्मा गांधीचे स्मारक सत्वर व्हावे

पुणे: दैनिक संध्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य परिसरात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या मागणीसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मारक समितीच्या शिष्टमंडळाने आज विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांची भेट घेतली. यावेळी समितीच्या सदस्यांनी महात्माजींचा पुतळा उभारणीसंदर्भातील आपली भूमिका आणि मागणी कुलगुरूंसमोर मांडली. पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत (मार्च २०२५ तसेच फेरप्रस्ताव २०२६) च्या मान्यप्राप्त ठरावानुसार, भारतीय स्वातंत्र्याचे जननायक राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळा उभारणीसंदर्भात ठराव मंजूर झालेले असतानाही, त्यावर अद्याप कोणतीही प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नसल्यामुळे, असंख्य पुणेकर नागरिक, संस्था आणि संघटनांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या म. गांधी स्मारक समितीच्या शिष्टमंडळाने कुलगुरूंची भेट घेतली आणि अधिसभेने मंजूर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करून पुतळा उभारणीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी मागणी केली. यावेळी कुलगुरू मा. प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी समितीच्या सर्व सदस्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यासंदर्भात त्यांनी पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी लवकरात लवकर पूर्ण करून, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्मारक उभारण्याच्या दृष्टीने सत्वर कार्यवाही करण्यात येईल, असे सकारात्मक आश्वासनही मा. कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दिले. स्मारक समितीने आपली भूमिका मांडताना प्रतिपादन केले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासारख्या ज्ञानकेंद्रात, विश्वमानव असलेल्या राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा पुतळा उभारला जाणे ही विद्यापीठाच्या दृष्टीनेही गौरवाची गोष्ट आहे. कुलगुरूंच्या कार्यकाळात हा पुतळा उभारला गेला, तर पुणे विद्यापीठासाठी व विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरासाठी ती आनंद व अभिमानाची बाब असेल, असेही समिती सदस्यांनी नमूद केले. आजच्या जगभरातील सामाजिक परिस्थितीत, महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा, सामाजिक सलोखा आणि मानवतेचे विचार समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे असून, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या 'पुणे शहरास' स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधी'च्या वास्तव्याची पार्श्वभूमी देखील असल्याकडे समितीने लक्ष वेधले.



आरोग्य शिबिरास सह धर्मादाय आयुक्त कोथळीकर यांची भेट

■ पुणे (दै. संध्या)

'श्री गणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत भोसलेनगर, हडपसर येथील युनिका सोसायटी गणेश मंडळाच्या वतीने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरास पुणे विभागाचे सह धर्मादाय आयुक्त दिनेश कोथळीकर यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शिबिरातील नागरिकांशी संवाद साधून आरोग्य सुविधांची माहिती घेतली.

श्री. कोथळीकर यांनी उपचार करणाऱ्या डॉक्टरांची भेट घेऊन शिबिरात उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य तपासणी सुविधांची माहिती घेतली. तसेच गणेश मंडळाचे स्वयंसेवक व सोसायटी सदस्यांशी संवाद साधला. त्यांनी स्वतः हिमोग्लोबिनची तपासणी करून घेत नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.

शिबिरास सुमारे २५० सोसायटी सदस्य व गणेश मंडळाचे स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी श्री. कोथळीकर यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य, नियमित आरोग्य तपासणी, योग्य आहार, व्यायाम आणि निरोगी जीवनशैली याबाबत नागरिकांना मार्गदर्शन केले. "उपचारापेक्षा प्रतिबंध महत्त्वाचा असून, नियमित आरोग्य तपासणीमुळे आजारांचे लवकर निदान होण्यास मदत होते," असे त्यांनी सांगितले. या आरोग्य शिबिरात एकूण ३५४ रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरात सर्वरोग निदान, हृदयरोग तपासणी, कर्करोग तपासणी, रक्ताच्या तपासण्या, डोळ्यांची तपासणी, दंतरोग तपासणी, महिलांची आरोग्य तपासणी तसेच रक्तदान आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. यावेळी धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, पुणे येथील अधीक्षक अभिजीत अनाप, जिल्हा न्यायाधीश गोसावी, सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक सागरराजे भोसले, वंशराजे भोसले, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक समर्थ सुरवसे आणि सामाजिक कार्यकर्ते अमित जागडे उपस्थित होते.'श्री गणेशा आरोग्याचा' हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सवाच्या माध्यमातून राज्यभर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचे नेतृत्व कक्षप्रमुख रामेश्वर भाऊ नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यात अभियानाचे नियोजन व समन्वय डॉ. मानसिंग साबळे, अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांनीही अभियानात सक्रिय सहभाग घेत आरोग्य तपासणी व जनजागृतीच्या माध्यमातून योगदान दिले.



MPSC विद्यार्थ्यांचे २ ऑक्टोबरपासून पुण्यात बेमुदत धरणे आंदोलन



कातकरी समाजातील ३१० लाभार्थ्यांना जातीचे दाखले व रेशनकार्डचे वितरण

■ पुणे (दै. संध्या)

जनजाती कल्याण आश्रम आणि सेवा सहयोग फाउंडेशन, पुणे यांच्या प्रयत्नातून तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, तहसील कार्यालय खेड आणि पंचायत समिती खेड यांच्या समन्वयातून विठ्ठलवाडी येथे ३१० लाभार्थ्यांना जातीचे दाखले व रेशनकार्डचे वितरण करण्यात आले.

खेड तालुक्यातील विठ्ठलवाडी येथे हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात रेशनकार्ड व जातीचे दाखले वितरित करण्यात आले.या उपक्रमामुळे कातकरी समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजना व सुविधांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास मदत झाली.

नाशिक जनजाती कल्याण आश्रमाचे सचिव शरद शेळके, प्रकल्प अधिकारी श्रीमती प्रियंका घनवट, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगावचे वरिष्ठ आदिवासी निरीक्षक शरद काळे, जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ चौरे उपस्थित होते.

श्री. शेळके यांनी मार्गदर्शनात हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या बलिदानाचा तसेच आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा उल्लेख केला. त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतींना अभिवादन करत आदिवासी समाजातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. उमा वाघ यांनी केले, तर घोडेगाव आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल रेणुका जाधव यांनी आभार मानले.

कार्यक्रमास अरुण काठे, शिवाजी चौरे, कैलास भालेकर, रेखा मराडे, योगेश चपटे, श्री. नितीन खरात, चिंतामण वडेकर, तुकाराम भांगरे, आदित्य जोशी, यांच्यासह जनजाती कल्याण आश्रमाचे पदाधिकारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसह विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासाठीचे बहुचर्चित बेमुदत धरणे आंदोलन २ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजल्यापासून एस. एम. जोशी पूल, नवी पेठ येथे सुरू होणार आहे. आज पुणे यांच्या समवेत आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थी प्रतिनिधींची एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीमध्ये तांत्रिक कारणांमुळे २७ सप्टेंबर रोजी होणाऱ्या आंदोलनाला परवानगी देता येत नसली, तरी २ ऑक्टोबर रोजी (गांधी जयंती) मात्र आंदोलनास परवानगी देण्याबाबत पोलिसांनी सहमती दर्शविली आहे.

PSC विद्यार्थ्यांनी यापूर्वी केलेल्या आंदोलनाद्वारे आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. त्या वेळी "त्यांचा कार्यकाळ आताच सुरू झाला असल्याने राजीनामा देता येणार नाही," अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. परंतु, अलीकडच्या कालावधीमध्ये विवेक भीमनवार यांच्या कारकिर्दीत काही पेपर फुटीची प्रकरणे समोर आल्यामुळे विद्यार्थी पूर्णतः आक्रमक झाले आहेत. अध्यक्षांच्या राजीनाम्याशिवाय आता आंदोलनातून माघार घेतली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत येत्या दोन दिवसांमध्ये MPSC विद्यार्थी आंदोलकांची एक संयुक्त बैठक होणार असून यात विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह इतर तीन प्रमुख मागण्या ठेवण्यात आल्या आहेत. या आंदोलनाला आमदार रोहित पवार यांनी पूर्ण पाठिंबा दिला आहे. रोहित पवार म्हणाले, "सदर आंदोलन हे पूर्णतः अराजकीय स्वरूपाचे असून केवळ विद्यार्थी हिताचे असल्याने यामध्ये आपण सहभागी आहोत. विद्यार्थ्यांना न्याय मिळणे, परीक्षांची पेपरफुटी थांबणे या प्रमुख विषयांसाठी आपण विद्यार्थ्यांसाठी सर्व पातळ्यांवर संघर्ष करण्यास तयार आहोत.

'सेवा संकल्प अभियान २०२६'मधून पुणे जिल्ह्यात लोकाभिमुख उपक्रमांना गती

■ पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान २०२६' राबविण्यात येत आहे. नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा थेट लाभ मिळवून देणे, ग्रामपंचायत स्तरावरील प्रलंबित कामांचा निपटारा करणे तसेच गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली.

अभियानांतर्गत जन्म-मृत्यू नोंदणी, विविध दाखले व प्रमाणपत्रे, आयुष्मान भारत कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्रे तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. 'आपले सरकार सेवा केंद्रां'च्या माध्यमातून नागरिकांना शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. गावांतील शाळा, अंगणवाडी, स्मशानभूमी तसेच अन्य सार्वजनिक संस्थांमधील मूलभूत सुविधांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, स्वच्छता, संरक्षण भिंत, परसबाग तसेच आवश्यक दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.अभियानाच्या माध्यमातून जलस्रोतांची स्वच्छता, जलसंधारण, पाणीपुरवठा व वैयक्तिक नळजोडणी, घनकचरा व्यवस्थापन, कचरा वर्गीकरण व कंपोस्टिंग, प्लास्टिकमुक्तीबाबत जनजागृती, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण आणि उपजीविकेशी संबंधित उपक्रमांनाही अभियानात महत्त्व देण्यात आले आहे. आरोग्य तपासणी शिबिरे, पोषण व ॲनिमियाबाबत जनजागृती, महिला आरोग्य व स्वच्छता, बचत गटांचे सक्षमीकरण तसेच महिला शेतकरी उत्पादक संस्थांशी संबंधित उपक्रम राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीत स्थानिक गरजेनुसार ठोस व दृश्यमान बदल घडवून आणण्यासाठी 'वन जीपी-वन व्हिजिबल चेंज' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, आरोग्य तपासणी, योग-ध्यान सत्र, प्लास्टिकमुक्ती, रस्ता सुरक्षा, जलसंधारण, कचरा वर्गीकरण, सायबर सुरक्षा, मतदार जागरूकता आणि शासकीय योजनांची माहिती देण्यासारख्या विविध उपक्रमांचा त्यात समावेश आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील १ हजार ३९९ ग्रामपंचायतींमध्ये या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

सक्षम यशदा उपक्रमांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



■ पुणे(दै. संध्या)

सक्षम यशदा उपक्रमांतर्गत तसेच आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून प्रकृति आयुर्वेद पंचकर्म क्लिनिक, औंध, यांच्या वतीने यशदा येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात यशदामधील ६० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या आरोग्य शिबिराचे उद्घाटन यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, उपमहासंचालक सचिन कलंत्रे, डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आणि डॉ. हेमंत वसेकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. समीर भाले आणि डॉ. तेजस्विनी भाले-बोरसे यांनी नाडी परीक्षणासह विविध आरोग्य तपासण्या करून सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक औषधांचे वितरण केले.

तसेच आहार, दैनंदिन जीवनशैली आणि पंचकर्म याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. तेजस्विनी भाले-बोरसे यांनी 'आपल्या आरोग्याला प्रथम प्राधान्य का द्यावे?' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले.

आपल्या २२ वर्षांच्या अनुभवाच्या आधारे त्यांनी जीवनशैलीशी संबंधित आजारांची कारणे, त्यापासून बचाव करण्यासाठी आवश्यक जीवनशैलीतील बदल तसेच प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र असलेल्या आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्य संवर्धनाचे उपाय याबाबत माहिती दिली. आरोग्य शिबिराच्या आयोजनासाठी निबंधक श्री. राजीव नंदकर आणि डॉ. राजेंद्र जोशी यांनी मार्गदर्शन केले. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

थोडक्यात पण महत्वाचे



श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष अॅड पानसे यांना राज्यस्तरीय भक्तीभूषण पुरस्कार प्रदान

जेजुरी : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष अॅड विश्वास पानसे यांना कै दिनकरराव स्मृती प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय भक्तीभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सावंत प्रतिष्ठानच्या वतीने गेली 27 वर्षे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करते. तसेच शाळा, विद्यार्थी, मंदिरे यांना आर्थिक मदत करत असते. आज पर्यंत या प्रतिष्ठानच्या वतीने दोनशे हून अधिक व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव केला आहे. जेजुरीच्या श्री मार्तंड देवसंस्थानचे अध्यक्ष अॅड विश्वास पानसे यांनी 30 वर्षात केलेल्या धार्मिक कार्याबद्दल त्यांना सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असणारे राजाभाऊ चौधरी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जेजुरी देवसंस्थांनचे विश्वस्त पोपट खोमणे, अभिजीत देवकाते, आसवली पिठाचे उद्यनाथ महाराज, जेजुरी खंडोबा पालखी सोहळा समिती व ग्रामस्थ मंडळाचे संतोष खोमणे, छबन कुदळे, अशोक खोमणे,देवस्थानचे अधिकारी बाळासाहेब खोमणे आदी उपस्थित होते. सावंत प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत, पुरस्कार समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विठ्ठल सोनवणे, सचिव रघुनाथ वाहुळ आदींनी या या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल सोनवणे, सूत्रसंचालन नितीन राऊत तर आभार पोपट खोमणे यांनी मानले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणं आवश्यक लोकशाहीच्या दृष्टीने

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वेळेत होणे ही केवळ राजकीय गरज नसून लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुका वेळेत पार पडण्यासाठी राज्य सरकार, राज्य निवडणूक आयोग, संबंधित विभाग आणि प्रशासन यांनी परस्परांमध्ये योग्य समन्वय साधणे आवश्यक आहे. निवडणुका लांबण्यामागे आरक्षण, प्रभागरचना, कायदेशीर किंवा प्रशासकीय कारणे असतील तर ती कारणे स्पष्टपणे जनतेसमोर मांडावीत आणि आवश्यक प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावी. कोणत्याही एका घटकावर दोषारोप करण्यापेक्षा, सर्व संबंधित यंत्रणांनी आपापली जबाबदारी पार पाडून निवडणुका पारदर्शक, निष्पक्ष आणि वेळेत घेण्यासाठी ठोस पावले उचलावीत, ही जनतेची अपेक्षा आहे. लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या मतदानाच्या अधिकारात आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी असणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या माध्यमातून कारभार चालविण्याची परिस्थिती दीर्घकाळ राहू नये. म्हणूनच महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयोग आणि संबंधित प्रशासनाने समन्वय साधून प्रलंबित निवडणूक प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी आणि जनतेला मतदानाचा घटनात्मक अधिकार बजावण्याची संधी द्यावी.'जनतेचा थेट सवाल'- आरक्षणाचा प्रश्न असेल तर तो कायद्याच्या चौकटीत सोडवावा, प्रभागरचना करायची असेल तर ती वेळेत पूर्ण करावी, प्रशासकीय कर्मचारी कमी असतील तर त्याची व्यवस्था करावी आणि न्यायालयीन अडचण असेल तर कायदेशीर प्रक्रियेतून मार्ग काढावा. मात्र या सर्व कारणांच्या नावाखाली स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडू नयेत, ही जनतेची अपेक्षा आहे.

यवत येथे 'महिला शेतकरी प्रमाणपत्र साठी ऑनलाईन अर्ज' व मार्गदर्शन शिबीर संपन्न

यवत : दैनिक संध्या

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या नवीन जीआरनुसार (GR) महिला शेतकऱ्यांना अधिकृत प्रमाणपत्र देऊन त्यांना योजनांशी जोडण्यासाठी यवत (ता. दौंड) येथे विशेष प्रचार व प्रसिद्धी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पुणे, उपविभागीय कृषी अधिकारी बारामती, तालुका कृषी अधिकारी दौंड व यवत मंडळ कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमा दरम्यान उपकृषी अधिकारी संतोष मोरे व सहायक कृषी अधिकारी सूरज बाबर यांनी महिलांना कृषी योजनांमधील महिलांच्या आरक्षणाविषयी व प्रमाणपत्राच्या उपयोगाबद्दल माहिती दिली. या प्रसंगी लक्ष्मी ढगे, छाया कोळपे, विमल भालेराव यांच्यासह परिसरतील महिला शेतकरी उपस्थित होत्या. प्रगतशील शेतकरी शंकर भालेराव,रविराज ढगे, तात्याबा दोरगे, ,नामदेव कऱ्हे, मल्हारी चोरमले, दत्तात्रय आढाव इ उपस्थितीत होते. सीएससी (CSC) केंद्राचे अक्षय भालेराव, राहुल बिचकुले व मंजिरी भागवत यांनी संगणकीय नोंदणीसाठी सहकार्य केले.

अप्पर तहसीलदार कार्यालयास मंजुरी मिळाल्याने चाकणकर खुश

चाकण: दैनिक संध्या



चाकण येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे. वाढता प्रशासकीय व्याप, लोकसंख्या आणि नागरिकांना सोयीस्कर सेवा पुरविण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रशासकीय कामांना गती मिळेल आणि नागरिकांना विविध सेवा अधिक सहजपणे उपलब्ध होणार आहेत. राजगुरुनगर येथील तहसील कार्यालयावरील वाढता कामाचा ताण, अपुरा कर्मचारी वर्ग आणि तालुक्यांचे भौगोलिक अंतर लक्षात घेता चाकण सारख्या महत्त्वाच्या ठिकाणी अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी होत होती. नागरिकांना प्रशासकीय सेवा त्यांच्या जवळ उपलब्ध व्हाव्यात, तसेच कामकाजात अधिक गतिमानता यावी या उद्देशाने या नवीन कार्यालयाच्या स्थापनेचा निर्णय घेण्यात आला ही खरोखरच कौतुकास्पद बाब असल्याचे चाकण नगरपरिषदेच्या नगरसेविका अॅड. वर्षाताई सुयोगदादा शेवकरी यांनी स्पष्ट केले. राजगुरूनगर तहसील कार्यालयावरील कामाचा बोजा कमी होणार आहे. चाकण परिसरातील नागरिकांना प्रशासकीय सेवा जवळ मिळणार असून, राजगुरुनगरच्या फेऱ्यांमधून चाकणकर नागरिकांची सुटका होणार आहे. अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू झाल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांची कामे मार्गी लागली पाहिजेत. मध्यस्थ, एजंट व दलाल यांचा सुळसुळाट रोखण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतल्यास अधिकाऱ्यांना आपले काम पारदर्शकपणे करणे अधिक सुलभ होण्यास मदत होईल.

नीरा बाजारपेठेतील चप्पल दुकानाच्या गोडाऊनला भीषण आग

■ नीरा(दै. संध्या)



नीरा शहराच्या मुख्य बाजारपेठेतील लक्ष्मी रोडवरील गौरी शू पॅलेस या चप्पल दुकानाच्या वरच्या मजल्यावरील गोडाऊनला रविवारी सकाळी दहाच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याने बाजारपेठेत एकच खळबळ उडाली. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर चप्पल, पुठ्ठे व इतर साहित्य असल्याने आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केले. आगीचे मोठे लोळ आणि धुराचे लोट परिसरात पसरल्याने शेजारील दुकाने व रहिवासी इमारतींना धोका निर्माण झाला होता. मात्र, ज्युबिलंट इनग्रेव्हीया कंपनीच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी दाखल होत शर्थीचे प्रयत्न केल्याने आग आटोक्यात आणण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र गोडाऊनमधील साहित्य जळून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

रविवारी सकाळी गौरी शू पॅलेसच्यावरच्या मजल्यावरील गोडाऊनमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर येत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. काही वेळातच गोडाऊनमध्ये आग लागल्याचे स्पष्ट झाले. परिसरातील युवकांनी तत्काळ आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, गोडाऊनमध्ये चप्पल, पुठ्ठे आणि अन्य ज्वलनशील साहित्य मोठ्या प्रमाणावर असल्याने आग वेगाने पसरली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट वाढू लागल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. शेजारील दुकानदारांनी खबरदारी म्हणून दुकाने बंद करून सुरक्षित ठिकाणी धाव घेतली, तर रहिवाशांमध्येही घबराट पसरली.

घटनेची माहिती मिळताच प्रभारी पोलीस पाटील राहुल शिंदे यांनी तातडीने ज्युबिलंट इनग्रेव्हीया कंपनीच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधून मदतीची विनंती केली. तसेच नीरा पोलीस दूरक्षेत्राला घटनेची माहिती देत बाजारपेठेतील वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली. दरम्यान, वीज वितरण कंपनीकडून खबरदारी म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

माहिती मिळताच ज्युबिलंटचे फायर युनिट तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत विविध बाजूंनी पाण्याचा मारा सुरू केला. गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणातील साहित्यामुळे आग भडकलेली असतानाही अग्निशमन कर्मचाऱ्यांनी धाडसाने आग विझविण्याचे काम सुरू ठेवले. अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले आणि संभाव्य मोठी दुर्घटना टळली. या कारवाईत ज्युबिलंटचे फायर कर्मचारी विशाल टेंगले, धनंजय धायगुडे, प्रकाश बेचके, अनिल जाधव, राजू गोरे आणि नासिर शेख यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, नीरा शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठेत ही घटना घडल्याने घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे काही काळ लक्ष्मी रोडवरील वाहतुकीची कोंडी झाली. घटनेची माहिती मिळताच नीरा पोलीस दूरक्षेत्राचे पोलीस उपनिरीक्षक रवीराज कोकरे, संतोष मदने, सचिन निकम तसेच प्रभारी पोलीस पाटील राहुल शिंदे यांनी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात ठेवत वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, आगीमुळे जवळापास १५ लाखाचे खनुकसान झाल्याची माहिती व्यापारी संपत मोठे यांनी दिली आहे . ज्युबिलंटच्या अग्निशमन दलाने वेळीच केलेल्या प्रभावी कारवाईमुळे मोठी आग शेजारील दुकाने आणि इमारतींपर्यंत पोहोचण्यापासून रोखण्यात आले.

२००१-०२ बॅचच्या विद्यार्थ्यांनी जागवल्या जुन्या आठवणी



■ जेजुरी: (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री. केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी येथे सन २००१-०२ एस.एस.सी. बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण, आनंदी आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. तब्बल २५ वर्षांनंतर माजी विद्यार्थी, तत्कालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकत्र आल्याने विद्यालयाचा परिसर जुन्या आठवणींनी भारावून गेला.

विद्यार्थ्यांचे स्वागत विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांनी केले. स्नेहमेळाव्याची विशेष सुरुवात तत्कालीन एस.एस.सी. बॅचचे वर्गशिक्षक सुरेश तिकोणे सर यांनी केली. त्यांनी २५ वर्षांपूर्वीच्या आठवणींना उजाळा देत माजी विद्यार्थ्यांचा पुन्हा एकदा 'पहिला तास' घेतला. तसेच विद्यार्थ्यांची हजेरी घेतल्याने माजी विद्यार्थ्यांना आपल्या शालेय जीवनातील तो काळ पुन्हा प्रत्यक्ष अनुभवता आला.

या अनोख्या उपक्रमामुळे उपस्थितांच्या भावनांना उजाळा मिळाला आणि वातावरण भावूक झाले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचे फुलांच्या पाकळ्या उधळून उत्स्फूर्त स्वागत केले. शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार, शिस्त आणि जीवनाची दिशा याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती आदर व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी मोरे व शुभांगी थोपटे यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या निवेदनातून शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. स्नेहमेळाव्याच्या नियोजनासाठी राऊत कुंडलिक, शुभांगी मोरे, शुभांगी थोपटे, विश्वास धुमाळ, कासुर्डे फुलचंद, कारकर बाबू, कारकर नवनाथ, कोकरे दत्तात्रय, खोपडे श्रीकांत, आमराळे गणेश, चिकणे पांडुरंग, जगताप संदीप, जाधव नागेश, तांबेकर लक्ष्मण, यादव शंकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

२१ सप्टेंबरला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभाचे उद्घाटन

■ मुंबई : (दै. संध्या)

राज्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या थेट संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दीनदयाळ उपाध्याय विश्वविक्रमी रोजगार महाकुंभ महाराष्ट्र'चा राज्यस्तरीय शुभारंभ मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. याच दिवशी कोकण व नाशिक विभागातील रोजगार मेळावे होणार आहेत. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून आयोजित हा सोहळा श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) महिला विद्यापीठ, चर्चगेट येथे होईल.

यावेळी या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, उद्योगमंत्री उदय सामंत, मंत्री जयकुमार रावल, मंत्री आकाश फुंडकर, महापौर रितू तावडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या या उपक्रमांतर्गत कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यांत ४१२ हून अधिक रोजगार मेळावे आयोजित केले आहेत. या उपक्रमात कोकण विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग तसेच नाशिक विभागातील नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, धुळे व नंदुरबार या १२ जिल्ह्यांचा समावेश आहे. या मेळाव्यांमधून स्थानिक स्तरावर २५ हजारांहून अधिक रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

खराबवाडीत दहा जणांच्या टोळक्याकडून वाहनांची तोडफोड

■ चाकण: (दै. संध्या)

बस पार्क करण्यासाठी हॉर्न वाजविल्याचा राग आल्याने आम्ही खराबवाडीतील भाई आहोत, अशी आरडा ओरड करीत दहा जणांच्या टोळक्याने दहशतीचा प्रचंड थरार करत लाकडी दांडके आणि दगडाने बस सह परिसरात उभ्या असलेल्या अन्य वाहनांच काचा फोडून मोठी तोडफोड केली. चाकण लगतच्या खराबवाडी येथे शनिवारी ही घटना घडली.

प्रशांत राजेंद्र मासुळे (वय - ३१, रा. खराबवाडी, ता. खेड, मूळ रा. धुळे) यांनी याप्रकरणी दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. प्रशांत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, शरद जाधव, ओमकार तलवारे, गुड्या उर्फ विशाल राठोड, ऋतिक पाईकराव, रुद्र चव्हाण, गण्या, देवानंद गरड, शिवम्या पवार, तेजा डिक्कर व शिव रामचंद्र मानवतकर (सर्वजण रा. खराबवाडी, चाकण.) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक माहिती अशी की, फिर्यादी प्रशांत मासुळे हे बस पार्क करण्यासाठी हॉर्न वाजवत असताना वरील सर्व आरोपीने तिथे बेकायदा गर्दी जमाव जमवला. या टोळक्याने हातात लाकडी दांडके, दगडाने बस, एक स्विफ्ट कार, छोटा हत्ती आणि सतरा सीटर बस अशा वाहनांच्या काचा फोडून प्रचंड नुकसान केले. हा प्रकार सुरू असताना मध्यस्थी करणाऱ्या नागरिकांना आरोपींनी धमकावत हवेत दांडके फिरवून खराबवाडी परिसरातील आम्ही भाई आहोत, असे धमकावत प्रचंड दहशत निर्माण केल्याचे प्रशांत मासुळे यांनी तक्रारीत नमूद केले आहे. दक्षिण महाळुंगे इंगळे पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

कारखान्यासाठी शंभर कोटीचे कर्ज घेताना संचालकांच्या जमिनी तारण ठेवुन कर्ज घ्यावे : प्रशांत काळभोर

■ लोणी काळभोर : (दै. संध्या)



श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्यासाठी शंभर कोटीचे कर्ज घेताना संचालकांच्या जमिनी तारण ठेवून कर्ज घ्यावे अशी आग्रही मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांनी आज झालेल्या सर्वसाधारण सभेत केली.

थेऊर येथील -श्री चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोरतापवाडी जवळील कला गोंविद लॉन्स येथे कारखान्याचे अध्यक्ष सुभाष जगताप यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली . रविवार दिनांक २७/९/२०२६ रोजी सकाळी साडे अकरा वाजता सुरू झाली .सभेत आलेल्यांचे स्वागत व्हाईस चेअरमन सौ. रत्नाबाई माणिक काळभोर यांनी केले संचालक किशोर उंद्रे यांनी निधन झालेले सभासद तसेच महाराष्ट्राचे लाडके नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहिली . सभेचे प्रस्ताविक चेअरमन सुभाष जगताप यांनी केले तर कार्यकारी संचालक कैलास झरे यांनी सभे पुढील येणारे विषय मांडण्यास सुरुवात केली . आणि थोडासा गोंधळ होण्यास सुरुवात होऊन एक एक विषय मंजूर करण्यात संचालकांना यश येत असल्याचे दिसून येताच .

कारखान्याचे माजी संचालक पांडुरंग काळे , कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर , सभासद राजेंद्र रतन चौधरी ,विकास लंवाडे , लोकेश कानकाटे यांनी त्यास विरोध केला .यावेळी प्रशांत काळभोर यांनी आक्रमक पवित्रा घेत सांगितले की सभासदांच्या भावना दाबू नका सभासदांना बोलू द्या तसेच कारखान्यासाठी १०० कोटी रुपये कर्ज घेण्याच्या तयारीत असलेल्या संचालकांनी स्वतःची जमीन म्हणून ठेवावी तसेच कारखाना चालू करण्यासाठी सभासद व संचालकांची कमिटी नेमून तसा अहवाल सादर करावा . विकास लंवाडे यांनी सांगितले की ही हुकूमशाही नाहीतर लोकशाही आहे .त्यामुळे सभासदांना बोलून द्यावे. कसला मांडे यांनी संचालकांना सांगितले की चिंतामणी ची शपथ घेऊन सांगा की तुम्ही खरे प्रोसिडिंग केले आहे संचालक म्हणतात की कारखान्यावर कसलेच रेकॉर्ड नाही तर तुम्ही मग अडीच वर्षे कशावर काम केले आहे.

ब्रेन पॅराडाईज इंटरनॅशनल स्कूल आणि एरा किड्स ए प्ले स्कूलच्या वतीने फॅशन शो

■ जेजुरी (दै. संध्या)



जेजुरी येथील मल्हार नाट्यगृह येथे ब्रेन पॅराडाईज इंटरनॅशनल स्कूल आणि एरा किड्स ए प्ले स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रमुग्ध करणाऱ्या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते.

"भारतीय संस्कृती आणि वारसा" (Indian Culture and Heritage) या मध्यवर्ती संकल्पनेवर (थीम) आधारित असलेल्या या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस आणि उत्कृष्ट सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. या सोहळ्याला प्रभात शर्मा एसबीआय लाईफ इन्शुरन्सचे असोसिएट व्हाईस प्रेसिडेंट, प्रभात शर्मा एसबीआय सेल्स मॅनेजर नितीन जाधव आणि जेजुरी देवस्थानचे विश्वस्त मंगेश घोणे प्रकाश खाडे, नगरसेविका मंदा बयास व नीलम सातभाई उपस्थित होते.

या फॅशन शो मध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वेस्ट मटेरियल (टाकाऊ वस्तू), भारतातील प्रसिद्ध फळे, विविध प्रकारची फुले आणि कार्टून पात्रांचा वापर करून तयार केलेले पर्यावरणपूरक पोशाख परिधान केले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या वेशभूषेतून आणि सादरीकरणातून भारताच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडवले: भारतीय पौराणिक कथा आणि राष्ट्रीय प्रतीके: काही विद्यार्थ्यांनी रामायण-महाभारतातील पौराणिक व्यक्तिरेखा आणि तिरंगा, वाघ, मोर यांसारखी भारताची राष्ट्रीय प्रतीके सुंदरतेने मंचावर साकारली. वस्त्रोद्योग आणि कला: भारताचा गौरवशाली वस्त्रोद्योग आणि पारंपरिक लोककलांचे दर्शन घडवणारे पोशाख यावेळी आकर्षणाचे केंद्र ठरले. संगीत आणि नृत्य प्रकार: भारतीय शास्त्रीय संगीत, पारंपरिक वाद्ये आणि देशातील विविध शास्त्रीय व लोकनृत्य प्रकारांवर आधारित थीम सादर करून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. टाकाऊ वस्तूंपासून शाश्वत फॅशन तयार करणे आणि नवोदित पिढीला भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे, याबद्दल पालकांनीही शाळा प्रशासनाचे आभार मानले. हा सोहळा जेजुरीकरांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला.

थोडक्यात पण महत्वाचे



स्मार्ट इंडिया हॅकाथॉन आणि एआयच्या माध्यमातून समस्यांवर प्रभावी उपाय

पिंपरी: दैनिक संध्या

आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात नवोपक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा प्रभावी वापर करून समाजासमोरील विविध समस्या अधिक कार्यक्षम आणि शाश्वत पद्धतीने सोडविता येऊ शकतात, असे प्रतिपादन पर्सिस्टंट सिस्टम्स कंपनीचे जागतिक कार्यक्रम व्यवस्थापक आशिष पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड रिसर्च येथे 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२६-२७' या स्पर्धेचे भारत सरकार शिक्षण मंत्रालय इनोव्हेशन सेल अंतर्गत आयोजन करण्यात आले होते. देशभरातील विद्यार्थ्यांना विविध समस्यांवर उपाय शोधण्यासाठी ही स्पर्धा प्रेरित करते. यामध्ये ५९० पेक्षा जास्त विद्यार्थी संघ सहभागी झाले होते. त्यापैकी ५० संघांची पुढच्या फेरीसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या हस्ते करण्यात आले. आशिष पाटील यांनी सांगितले की, विविध उद्योगांमध्ये एआय चा वापर डेटा विश्लेषण, निर्णय प्रक्रिया, उत्पादन व्यवस्थापन, ग्राहक सेवा तसेच जटिल समस्यांचे जलद आणि अचूक निराकरण करण्यासाठी केला जातो. महाविद्यालयाचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, समाजातील प्रत्यक्ष समस्या ओळखून त्यावर नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याची गरज विद्यार्थी यांच्या माध्यमातून पूर्ण करू शकतात. आरोग्य, शिक्षण, शेती, पर्यावरण, वाहतूक, ग्रामीण विकास आणि सार्वजनिक सेवा यांसारख्या विविध क्षेत्रांतील समस्यांचे निराकरण करण्यासाठी एआय चा प्रभावी आणि जबाबदारीने वापर करता येऊ शकतो. कोणतीही समस्या सोडविताना प्रथम समस्येचे सखोल आकलन करणे, आवश्यक माहिती व डेटा संकलित करणे, योग्य तंत्रज्ञानाची निवड करणे आणि त्यावर आधारित प्रत्यक्ष उपयोगात येईल असा परिणामकारक उपाय विकसित करणे आवश्यक असल्याचे डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले.

पीसीसीओईआर येथे 'आविष्कार' पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या



विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमासह उद्योग आणि समाजाच्या प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन आपले कौशल्य अद्यावत करायला हवे. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, नाविन्यपूर्ण विचार, तांत्रिक कौशल्ये आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणे हा उद्देश 'आविष्कार' पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेतून पूर्ण होत असल्याचे दिसून येते असे महिंद्रा समूहाचे वरिष्ठ व्यवस्थापक श्रवण पाटील यांनी सांगितले. पिंपरी एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च येथे आयक्यूएसी आणि रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागाच्या सहकार्याने "आविष्कार २०२६-२७" या संस्थास्तरीय प्रकल्प स्पर्धेतील पोस्टर प्रेझेंटेशनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पीसीसीओईआर महाविद्यालयाचे संचालक डॉ. हरीश तिवारी, आयक्यूएसी चे अधिष्ठाता व उपसंचालक डॉ. राहुल मापारी, आर. अँड डी. अधिष्ठाता डॉ. सुदर्शन बोबडे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत १०० पेक्षा अधिक प्रकल्प संघांनी सहभाग घेतला होता. विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान, ऊर्जा, पर्यावरण, सामाजिक समस्या, औद्योगिक गरजा आणि नाविन्यपूर्ण अभियांत्रिकी उपायांवर आधारित प्रकल्प पोस्टरच्या माध्यमातून सादर केले. संचालक डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांमधून आपल्या ज्ञानात वाढ करावी. आर. अँड डी. अधिष्ठाता डॉ. सुदर्शन बोबडे यांनी देखील मार्गदर्शन केले. आयोजनात डॉ. राहुल मापारी आणि समन्वयक डॉ. सुखदीप चौगुले यांनी सहभाग घेतला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

पिंपरी-चिंचवडमध्ये 'डीजे' शांत; 'बापट इफेक्ट' की 'चौबे पॅटर्न'?

पिंपरी : दैनिक संध्या

यंदाच्या गणेश विसर्जनात पिंपरी-चिंचवडमध्ये एक गंमतीदार, पण बोलका प्रश्न चर्चेत राहिला,.'डीजे' शांत झाला तो 'बापट इफेक्ट' मुळे की 'चौबे पॅटर्न' मुळे? ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा सातत्याने ऐरणीवर ठेवणारे विद्यानंद बापट यांनी वातावरण तापवले; तर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या यंत्रणेने 'नियम मोडला तर थेट गुन्हा आणि साहित्य जप्त' हा फॉर्म्युला रस्त्यावर उतरवला. परिणामी, पुण्यात विसर्जन मिरवणुकीत 'डीजे'चा आवाज चर्चेत राहिला; मात्र पिंपरी-चिंचवडमध्ये 'डीजे'वाल्यांनी 'प्ले'चे बटन दाबताना हात आखडता घेतल्याचे दिसून आले. गणेशोत्सव सुरू होण्यापूर्वीच 'डीजे'चा मुद्दा 'फुल व्हॉल्युम'वर आला होता. बापट यांनी ध्वनिप्रदूषणाचे नियम आणि त्यांच्या अंमलबजावणीचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला. त्यामुळे हा विषय केवळ मंडळे आणि पोलिसांपुरता मर्यादित न राहता नागरिक आणि माध्यमांच्याही केंद्रस्थानी आला. यंदा केवळ घोषणा होणार की प्रत्यक्ष कारवाई, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, प्रश्नाला आवाज देणे वेगळे आणि रस्त्यावर उतरून नियम पाळायला लावणे वेगळे. नेमके इथेच 'चौबे पॅटर्न' सुरू झाला. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी यंदा केवळ 'आवाज कमी करा' अशी तोंडी सूचना देऊन समाधान मानले नाही. पाचव्या, सातव्या आणि नवव्या दिवसाच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये नियम मोडणाऱ्या डीजेवाल्यांवर थेट गुन्हे दाखल करण्यात आले. साऊंड सिस्टीम, मिक्सर, ॲम्प्लीफायर तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले; काही प्रकरणांत वाहनांवरही कारवाई झाली. सुरुवातीला एक-दोन कारवायांनंतर पोलिसांचा उत्साह मावळेल, असा अंदाज काहींचा होता; मात्र कारवाईचा वेग वाढतच गेला. तेव्हा 'डीजे'वाल्यांच्या लक्षात आले की, यंदा 'बेस' वाढवला तर पोलिस 'केस' वाढवणार! सुरुवातीच्या टप्प्यात काही मंडळांकडून स्थानिक पातळीवर सवलत मिळवण्याचे प्रयत्न झाले. 'थोडा वेळ वाजवू द्या', 'आपलेच मंडळ आहे', 'आवाज कमी ठेवतो' अशा विनवण्याही झाल्या.

२७ वी राज्यस्तरीय श्रावणी काव्यमैफल उत्साहात संपन्न

काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव; विविध पुरस्कारांचे वितरण आणि पुस्तकांचे प्रकाशन

■ भोसरी (दै. संध्या)



नक्षत्राचं देणं काव्यमंच, भोसरी-पुणे यांच्या वतीने आयोजित २७ वी राज्यस्तरीय श्रावणी काव्यमैफल २०२६, २७ वी राज्यस्तरीय श्रावणी काव्यलेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ, विविध पुरस्कारांचे वितरण आणि पुस्तक प्रकाशन सोहळा सायन्स पार्क नाट्यगृह, विज्ञान केंद्र, चिंचवड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी व विचारवंत प्रा. नरेंद्र पोतदार होते. कार्यक्रमाचे उद्घाटन काव्यरसिक राजेंद्र गवते यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून सायन्स पार्कचे संचालक-प्रमुख प्रवीण तुपे, कवी प्रा. महादेव रोकडे, लेखिका सौ. साधनाताई चौधरी, शरदराव ताजणे, श्रीराम एरंडे, संजय माने, सौ. वैशाली बोरकर तसेच काव्यमंचचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. राजेंद्र सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्रा. नरेंद्र पोतदार म्हणाले की, "कवीच्या कवितेला शरीर, मन आणि आत्मा असला पाहिजे. कवितेला स्पर्धा नसते; कवी आपल्या प्रतिभेनुसार कविता लिहीत असतो. मात्र, स्पर्धेमुळे कवितेचा दर्जा निश्चितच सुधारतो. त्यासाठी कवीने सातत्याने वाचन करणे आवश्यक आहे. कवितेची चळवळ उभी करणाऱ्या काव्यमंचने हजारो कवींना घडविण्याचे काम केले आहे. संवेदनशीलता जपल्याशिवाय कवी घडू शकत नाही. समाजाची विस्कटलेली घडी कविताच पुन्हा बसवू शकते," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे उद्घाटक राजेंद्र गवते यांनी काव्यमंचच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "गेली सत्तावीस वर्षे सुरू असलेला हा काव्ययज्ञ कवींच्या लेखणीला फुलविणारा आहे. पिंपरी-चिंचवडला कवितेची राजधानी बनविण्यात काव्यमंचचे मोठे योगदान आहे. हजारो कार्यक्रमांच्या माध्यमातून संस्थेने अनेक कवी घडविले असून रसिकता जपण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे," असे ते म्हणाले.

तीन पुस्तकांचे प्रकाशन

कार्यक्रमात 'बदलती प्रसारमाध्यमे व कायदा' या संजय माने लिखित पुस्तकाचे, 'ओघळणारे अश्रू' या कवयित्री सौ. वैशाली (जया) बोरकर, नागपूर यांच्या कथासंग्रहाचे तसेच 'वादळ' या कवी वादळकार, पुणे यांच्या चारोळीसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

विविध पुरस्कारांचे वितरण

यावेळी समाजभूषण पुरस्कार २०२६ स्तंभलेखक व विचारवंत संजय नलावडे (मुंबई) तसेच आदिवासी सेवक व पर्यटकप्रेमी दत्तात्रय मुठे (फोफसंडी) यांना प्रदान करण्यात आला.

समाजसेवक सावळेराम रखमाजी डबडे कविरत्न पुरस्कार २०२६ कविवर्य सुरेशचंद्र चनाल (निगडी) यांना, तर कुसुमाग्रज स्मृती गौरव पुरस्कार २०२६ ग्रामीण कवी रामदास अवचर (सुपे) यांना सन्मानचिन्ह, गौरवपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

याशिवाय १९ वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०२५ मधील विजेत्यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक 'सृजन संवाद', द्वितीय क्रमांक 'मनोकल्प', तृतीय क्रमांक 'छायांकित', तसेच 'पद्मरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

श्रावणी काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

२७ व्या राज्यस्तरीय श्रावणी काव्यलेखन स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, रोख रक्कम, गुलाबपुष्प व पुस्तके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेत प्रथम क्रमांक कविवर्य नामदेव पाटील (कोल्हापूर) यांनी मिळविला. त्यांच्या 'श्रावण व निसर्ग' या कवितेला प्रथम क्रमांक मिळाला. द्वितीय क्रमांक कवयित्री प्रभा वाघ (चाकण) यांच्या 'क्षण श्रावणाचे' या कवितेला, तर तृतीय क्रमांक सौ. कविता दाते (वर्धा) यांच्या 'माया श्रावणाची' या कवितेला मिळाला.

उत्तेजनार्थ पारितोषिकांमध्ये धनाजी खाडे (वसई) – 'श्रावण चाहूल', नीलकृष्ण देशपांडे (यवतमाळ) – 'श्रावण सोहळा' आणि श्रीपाद टेंबे (पुणे) – 'मनात बरसलेला श्रावण' या कवींना गौरविण्यात आले.

महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या कवी-कवयित्रींनी 'श्रावण व निसर्ग' या विषयावर आधारित विविध सुंदर रचना सादर करून काव्यमैफल रंगतदार केली. सहभागी प्रत्येक कवीला गुलाबपुष्प व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या संयोजनात डॉ. बबन चव्हाण, बालाजी थोरात, संजय पोटे, सुरेशचंद्र चनाल, प्रमोद डोंगरदिवे, सुजित माने, वेदांत बोरकर, शांतीलाल ननवरे, रवी भोजने, तुषार डावखर, प्रतिभा कीर्तीकर्वे आदींनी योगदान दिले. सलग सुमारे पाच तास रंगलेल्या या श्रावणी काव्यसोहळ्याची सांगता विश्वगीत व पसायदानाने करण्यात आली. नक्षत्राचं देणं काव्यमंचच्या माध्यमातून आतापर्यंत आठ अखिल भारतीय मराठी नक्षत्र महाकाव्यसंमेलने, १७० प्रतिनिधी काव्यसंग्रहांचे प्रकाशन, हजारो काव्यमैफली, शेकडो काव्यबैठका, कार्यशाळा आणि काव्यसहलींचे आयोजन करण्यात आले आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात काव्यमंचच्या शाखा कार्यरत असून काव्यविषयक चळवळीला व्यापक स्वरूप देण्याचे कार्य संस्थेकडून सुरू आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व संयोजन काव्यप्रेमी प्रा. राजेंद्र दशरथ सोनवणे (कवी वादळकार, पुणे), संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष, नक्षत्राचं देणं काव्यमंच यांनी केले.

भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते मंगळवारी माथाडी संघटन महामेळाव्याचे उद्घाटन - अनुप मोरे



■ पिंपरी: (दै. संध्या)

भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेचा राज्यस्तरीय महामेळावा मंगळवारी (दि. २९) दुपारी दोन वाजता, चिंचवड, ऑटो क्लस्टर येथे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन भाजपा प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे अशी माहिती माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षा रक्षक जनरल कामगार युनियन (रजि.) संस्थापक अध्यक्ष अनुप अविनाश मोरे यांनी रविवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी भाजपा शहर अध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार उमा खापरे, माजी उप महापौर व ज्येष्ठ नगरसेवक तुषार हिंगे, युनियन प्रदेश अध्यक्ष विजय हरगुडे, पुणे जिल्हा अध्यक्ष अक्षय वरघडे, प्रदेश सरचिटणीस संतोष कांबळे, भाजपा मंडल अध्यक्ष जयदीप खापरे, युनियन शहर उपाध्यक्ष इम्रान पानसरे, चंदन सिंग, किरण पनाले आदी उपस्थित होते.

यावेळी अनुप मोरे यांनी सांगितले की, भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक जनरल कामगार युनियन (रजि.) या संस्थेच्या राज्यस्तरीय महामेळाव्याचे आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यावेळी रवींद्र चव्हाण हे मुख्य मार्गदर्शन करणार आहेत. सन २०३० पर्यंत राज्यातील विविध जिल्ह्यात ३० हजार पदाधिकारी जोडण्याच्या संकल्प करण्यात येणार आहे. तसेच संस्थेच्या उद्दिष्टावर विचारविनिमय होईल. यामध्ये १४ जिल्ह्यांतील ६ हजारांहून अधिक माथाडी पदाधिकारी सहभागी होणार आहेत अशी अनुप अविनाश मोरे यांनी दिली.

या मेळाव्यात कामगारांचा रोजगार, सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा आणि कल्याण संबंधित विविध विषयांवर मार्गदर्शन, माथाडी संघटना अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, कामगारांच्या समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विचारविनिमय होणार आहे. त्याचबरोबर ऑटो क्लस्टर येथील दुसऱ्या सभागृहामध्ये सकाळी ९ वाजता, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार महाकुंभ मेळाव्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. अनुप मोरे सोशल अँड स्पोर्ट्स फाऊंडेशन, आरंभ सोशल फाऊंडेशन आणि टीम पिंपरी चिंचवड, 'युवा हब स्किल मॅनेजमेंट प्रा. लि.' यांच्या सहकार्याने महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती आमदार उमा खापरे यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या महाकुंभात पिंपरी चिंचवड परिसरातील उद्योग क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, पात्र उमेदवारांना ऑन द स्पॉट नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे अशी माहिती आमदार उमा खापरे यांनी यावेळी दिली.

पाचवी पास पासून उच्चशिक्षित उमेदवारांपर्यंत सर्व पात्र युवकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी दिल्या जाणार आहेत. सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत हा महामेळावा होईल. या महाकुंभामध्ये बँकिंग, आयटी, आयटीआय, बीपीओ, केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल आणि टेक्नॉलॉजी यांसारख्या विविध अग्रगण्य क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत अशी माहिती माजी उपमहापौर व ज्येष्ठ नगरसेवक तुषार हिंगे यांनी दिली. या महाकुंभ मेळाव्यात ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, हुडास टेक्नॉलॉजी, विगल स्पेस, बजाज, हुंडाई यासारख्या नामांकित कंपन्यांचा सहभाग असणार आहे. ५ वी ते १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर सर्व पात्र उमेदवारांना त्यांच्या कौशल्यानुसार नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मेळाव्यात सहभागी झालेल्या परंतु तात्काळ नोकरी न मिळालेल्या उमेदवारांसाठी आयोजकांच्या वतीने एक नाविन्यपूर्ण 'जॉब कार्ड' उपक्रम राबविला जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी आपल्या आवश्यक कागदपत्रांसह व अपडेटेड बायोडाटासह मंगळवारी वेळेत उपस्थित राहावे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेवर तीन वाहनांची धडक



■ पिंपरी (दै. संध्या)

लोणावळा: मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे वर शनिवारी (दि. २६) दुपारी तीन वाजताच्या सुमारास तीन वाहनांचा भीषण अपघात मिसिंग लिंकजवळ झाला. उतारावर तीन वाहने एकमेकांना जोरात धडकल्यामुळे झालेल्या या अपघातामध्ये एका चालकाचा मृत्यू झाला असून, अन्य दोन जण जखमी आहेत. संदीप कोळी (वय 35, रा. कुंभोज, कोल्हापूर) असे या अपघातात मृत्यू झालेल्या चालकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापूरहून मुंबईच्या दिशेने फेविकॉल सदृश केमिकल घेऊन जाणारा आयशर टेम्पोवरील चालक संदीप कोळी याची गाडीवरील नियंत्रण सुटलेले उतारावर तो समोर जाणाऱ्या दुसऱ्या एका टेम्पोला मागून जोरात धडकला. ही धडक एवढी भीषण होती की समोरचा टेम्पो हा त्याच्या पुढे जाणाऱ्या एका ट्रेलरला मागून जोरात धडकला. या अपघातामध्ये केबिनमध्ये अडकल्यामुळे चालकाचा मृत्यू झाला, तर अन्य चालक हे गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर टेम्पोमधील फेविकॉल रस्त्यावर सर्वत्र पसरले तसेच समोरच्या टेम्पोमधील पुठ्ठे हेदेखील रस्त्यावर पसरल्यामुळे मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक विस्कळीत झाली होती. या अपघातामुळे मुंबई लेनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. अपघाताची माहिती समजतात बोरघाट महामार्ग पोलिस खोपोली पोलिस व अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते यांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहनांमधील चालकांना बाहेर काढले. घटनास्थळावरील फेविकॉल व अपघातग्रस्त वाहने बाजूला करत तासाभरात रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

प्रा . सुरेखा कटारिया विशेष राष्ट्रीय सेवा पुरस्काराने सन्मानित

■ चिंचवड (दै. संध्या)



दिनांक २४ सप्टेंबर रोजी सुरत येथे भव्य कार्यक्रमात श्री अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन परिषद, नवी दिल्ली. ध्यानयोगी आचार्य डॉक्टर परम पूज्य भगवान शिवाचार्य म.सा.नेश्रयामध्ये यांच्या ८७ व्या जयंतीनिमित्त, प्राध्यापक सुरेखा प्रकाशजी कटारिया यांना विशेष राष्ट्रीय सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी, संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुलजी जैन, राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अमितजी रॉय, माननीय कांतिकुमारजी जैन (अल्पसंख्याक राष्ट्रीय अध्यक्ष), माननीय रमेशजी भंडारी - ट्रस्टेड जैन परिषद, नवी दिल्ली, राष्ट्रीय महिला अध्यक्ष संतोषजी जैन, राष्ट्रीय महिला चेअरमन अनामिकाजी तलेसारा, राष्ट्रीय महिला सरचिटणीस रिचाजी जैन, प्रत्येक प्रांत जैन भवनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोकजी पगारिया, माजी राष्ट्रीय अध्यक्ष पारसजी मोदी, माजी प्राचार्य प्रकाशजी कटारिया, माननीय राष्ट्रीय महिला अध्यक्ष रुचिराजी सुराणा कीर्तनकार डॉक्टर श्वेता राठोड सुभाषजी सुरांना यांच्या उपस्थितीत आणि आचार्य भगवंत शिवाचार्य यांच्या आशीर्वादाने, राष्ट्रीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रा. सुरेखा प्रकाशजी कटारिया यांना 'अति विशिष्ट सेवा सन्मान' देऊन गौरविण्यात आले. प्राध्यापिका सुरेखा कटारिया या एक ज्येष्ठ साहित्यिक असून त्यांनी आतापर्यंत दहा पुस्तके लिहिली आहेत.

राष्ट्रीय संत आचार्य आनंदऋषीजी महाराज साहेब यांच्या जीवनावर लिहिलेल्या 'आनंद यात्री' या पुस्तकाला साहित्य रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे, 'आईने घडवलेला, श्याम कुठे, कुठे हरवला श्याम, व्हय मी सावित्री बोलते...!' या विषयावर संपूर्ण महाराष्ट्रात त्यांच्या कथाकथनाचे वैयक्तिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे, गुरु भगवानांच्या त्यागमय जीवनावर माहितीपट बनवून, त्यांचे त्यागमय जीवन आपल्या तरुण पिढीसमोर, मुलांसमोर मांडण्याचे त्यांचे प्रयत्न अत्यंत प्रशंसनीय आहेत. त्यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेऊन, आचार्य ध्यानयोगी शिवाचार्य यांच्या जन्मोत्सवानिमित्त त्यांचा सुरत येथे सन्मान करण्यात आला.

प्रा .सुरेखा कटारिया विविध संस्थांमध्ये पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.ऑल इंडिया कटारिया फाउंडेशन, राष्ट्रीय महिला उपाध्यक्ष, श्री ऑल इंडिया जैन कॉन्फरन्स, राष्ट्रीय महिला उपाध्यक्ष, स्वानंद महिला संस्थापक अध्यक्ष पिंपरी चिंचवड, भारतीय जैन संघटना विद्यालय आणि महाविद्यालयाच्या माजी उपप्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारे बहुवर्षीय व्याख्याता सेवेसाठी नियुक्त व्याख्याता, श्री आनंद मंगल एज्युकेशन ट्रस्ट, चिंचवडच्या महासचिव आहेत.

संपूर्ण पिंपरी चिंचवड मधील साहित्यिक आणि संस्थांनी त्यांचे फोनद्वारे, भेटून अभिनंदन केले आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



भारत गौरव श्री पुरस्काराने अनिल डोंगरे सन्मानित

आळंदी : दैनिक संध्या

लेखक, साहित्यिक, रचनाकार व कवी अनिल लक्ष्मण डोंगरे यांना 'भारत गौरव श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कला साधना सामाजिक संस्था, नवी मुंबई (कामोठे) यांच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात डोंगरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कामोठे येथील रयत शिक्षण संस्थेच्या कार्यालयात रविवारी झालेला हा सोहळा शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार, भारत गौरव श्री पुरस्कार तसेच कला तपस्वी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमास माजी आमदार बाळाराम पाटील, डॉ. रत्नाकर अहिरे, सतीश देशमुख तसेच सुप्रसिद्ध अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पत्रकारिता, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत अनिल डोंगरे यांचा गौरव करण्यात आल्याने त्यांच्या जन्मभूमी नारायणगावसह परिसरातून तसेच पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



दिनचर्या बदला आणि निरोगी, आनंदी व दिर्घायुष्य जगा - डॉ. अजय जोगदंड

जुन्नर : दैनिक संध्या

डॉ. गोविंद मोघाजी गारे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माणिकडोह येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त दिनचर्या, ऋतूचर्या,योग आणि आयुर्वेद याविषयी बोलताना डॉ.अजय जोगदंड यांनी प्रशिक्षणार्थी व निदेशक वर्गास मोलाचे मार्गदर्शन केले.योगा आणि आयुर्वेदमुळे निरोगी,आनंदी व दिर्घायुष्य जगा असा सल्लाही दिला. विद्यार्थ्यांमध्ये AI व गेममुळे मोबाईलचा वाढता वापर आणि त्याचा आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम यावर चिंता व्यक्त केली. यावेळी डॉ. जोगदंड यांनी आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार कसा द्यावा यावर प्रात्यक्षिक स्वरूपात प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमाचे नियोजन नितीन जाधव, किरण साळुंखे, संदिप लोखंडे, अविनाश खरात यांनी तर यावेळी संस्थेचे प्राचार्य विजय नार्वेकर,गटनिदेशक तथा राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख नानासाहेब कुलकर्णी, संतोष गायकवाड, भोरु बांबळे, सचिन काजळे, अशितोष पोकळे, गंगाधर जोपळे, गायत्री केंकले, कल्याणी बांबळे इ. उपस्थित होते.

विक्रांत पतसंस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

नारायणगाव : दैनिक संध्या

विक्रांत पतसंस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेला संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संतोषनाना खैरे, सुजितभाऊ खैरे, अमितशेठ बेनके, सूरजभाऊ वाजगे, नारायणगावच्या लोकनियुक्त सरपंच शुभदाताई वाव्हळ, उपसरपंच बाबू पाटे, शिवसेना शहर समन्वयक बिन्नी साहेब औटी,अशोकशेठ गांधी, संस्थेचे अध्यक्ष संतोषदादा वाजगे, उपाध्यक्ष तसेच संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. सभेदरम्यान संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच संस्थेच्या आगामी वाटचालीसाठी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन करून संस्थेला पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

इंदापूर तालुक्यात 'सेवा संकल्प अभियान' उत्साहात

स्वच्छता, रक्तदान, आरोग्य तपासणी, महिला शेतकरी सन्मान व चित्रकला स्पर्धेतून सामाजिक बांधिलकी

■ बारामती (दै. संध्या)

समाजातील विविध घटकांपर्यंत सेवा पोहोचविणे, स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करणे, आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे तसेच सामाजिक बांधिलकीची भावना दृढ करणे या उद्देशाने दि. १७ सप्टेंबर पासून १७ ऑक्टोबर पर्यंत इंदापूर तालुक्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. इंदापूर तालुका पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सचिन खुडे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध गावांमध्ये सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच शेतकरी यांचा सहभाग वाढवून सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देण्यात येत आहे.

कांदलगाव येथील प्राथमिक शाळेच्या परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ व सुंदर परिसराचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मानकरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. शाळा परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय व सार्वजनिक ठिकाणांविषयी जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

निंबोडी येथे रक्तदान हे सामाजिक बांधिलकीचे महत्त्वपूर्ण कार्य असून, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होत गरजू रुग्णांना मदतीचा हात देण्याचे आवाहन शिबिराच्या माध्यमातून करण्यात आले.

डिकसळ येथे आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांची आरोग्य तपासणी करून आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्यसेवा व आरोग्यविषयक जनजागृती उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.



पिटकेश्वर येथे महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. महिला शेतकऱ्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. याचबरोबर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला.

गोखळी येथे जिल्हा परिषद शाळा तसेच मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सार्वजनिक व धार्मिक स्थळे स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती करत नागरिकांनीही स्वच्छता उपक्रमात सहभागी व्हावे, असा संदेश देण्यात आला.

या सर्व उपक्रमांमधून स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग या विविध बाबींवर भर देण्यात आला. गावपातळीवर नागरिकांचा सहभाग वाढवून विकासकामांना लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न या अभियानातून करण्यात येत आहे.

इंदापूर तालुक्यात 'सेवा संकल्प अभियान'च्या माध्यमातून विविध गावांमध्ये राबविण्यात येणारे उपक्रम नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करणारे ठरत असून, 'सेवा हीच सामाजिक बांधिलकी' या भावनेला बळ मिळत आहे.

आदित्यशेठ धारिवाल यांचा वाढदिवस मुलांना गोष्टीची पुस्तके व खाऊ वाटप करून साजरा

■ शिरूर (दै. संध्या)

युवा उद्योजक श्री आदित्यशेठ प्रकाशभाऊ धारिवाल यांचा वाढदिवस नगरसेविका स्वप्नालीताई योगेश जामदार मित्र परिवार आयोजित बाल संस्कार वर्गात साजरा करण्यात आला. या वेळी मुलांना जनविकास फाउंडेशनच्या वतीने तुषार वेताळ व भूषण कडेकर यांच्या वतीने वाचनाची आवड जपणे व वाढवणे यासाठी मुलांना गोष्टीची पुस्तके वाटप करण्यात आली.

या वेळी मुलांनी विश्वप्रार्थना म्हणून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी बोलताना नगरसेविका स्वप्नाली जामदार म्हणाल्या कि, धारिवाल कुटुंबाचा सामाजिक व औद्योगिक वारसा सांभाळण्याचे व वाढवण्यासाठीचे आवश्यक ते सर्व गुण आदित्यशेठ धारिवालांमध्ये आहेत. पुढील काळात नक्की शहराचे नेतृत्व ते करतील.



भूषण कडेकर शुभेच्छा देताना म्हणाले कि, मुलांमध्ये वाचनाची गोडी वाढावी व ते मोबाईल पासून दूर जाऊन पुस्तकांच्या जवळ जावीत म्हणून हा उपक्रम रबावण्यात आला. व आदित्यशेठ यांचा वाढदिवसा पेक्षा मोठा मुहूर्त दुसरा मिळाला नसता.

या वेळी नगरसेविका चारुशीलाताई कोळपकर, तुषार वेताळ यांनी आदित्यशेठ धारिवाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी नगरसेविका चारुशीलाताई कोळपकर, नगरसेविका स्वप्नालीताई जामदार, डॉ.वैशालीताई साखरे, शितल शर्मा, डॉ संतोष पोटे, गणेश कोळपकर, तुषार वेताळ, भूषण कडेकर, योगेश जामदार, राजकुमार स्वामी, शहाजी पवार, अतुल तांबटकर व आदी उपस्थित होते. या वेळी बाल संस्कार वर्गाच्या मुलांना डॉ संतोष पोटे यांच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ वैशाली साखरे यांनी केले तर नगरसेविका स्वप्नालीताई जामदार यांनी आभार मानले.

कोबीला बाजारभावाचा फटका; उत्पादन खर्चही निघेना

■ पिंपरखेड (दै. संध्या)

सध्या कोबी पिकाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. चांगला बाजारभाव मिळेल, या आशेने घेतलेल्या कोबी पिकाला बाजारात अपेक्षित उठाव नसल्याने बेट भागातील शेतकरी निराश झाले आहेत.

कोबी लागवडीपासून मशागत, रोपे, खते, औषधांची फवारणी, पाणी, मजुरी तसेच काढणी व वाहतूक, यावर मोठ्या प्रमाणात खर्च झाला आहे. पीक चांगले आले असले तरी बाजारभाव समाधानकारक नसल्याने उत्पादन विक्रीतून झालेला खर्चही भरून निघणे कठीण झाले आहे.

बेट भागातील कोबी मंचर, नारायणगाव येथील बाजार समितीत विक्रीसाठी जात आहे. सध्या बाजारात कोबीची आवक वाढली असून, मागणीच्या तुलनेत उठाव कमी असल्याने भावावर परिणाम झाला



आहे. प्रतिदहा किलोस प्रतवारी नुसार ३० ते ७५ रुपये भाव मिळत आहे. त्याचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. उत्पादन खर्च आणि मिळणारा बाजारभाव, यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे.

कोबीला चांगला बाजारभाव मिळेल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पीक घेतले. मात्र, भावातील घसरणीमुळे शेतकऱ्यांचा आर्थिक ताळमेळ बिघडला आहे. उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळावा, अशी अपेक्षा कोबी उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

जुन्नरच्या शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी वाचवण्यासाठी प्रयत्न करणार : अतुल बेनके

■ नारायणगाव (दै. संध्या)

लातूर-कल्याण जनकल्याण महामार्गाच्या प्रस्तावित अलाइनमेंटमुळे जुन्नर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी बाधित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या महामार्गाच्या अलाइनमेंटमध्ये बदल करून शेतकऱ्यांच्या जमिनी वाचवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे माजी आमदार अतुल बेनके यांनी सांगितले.

यासंदर्भात मुंबईतील दादर येथील MSRDC कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत MSRDC चे प्रमुख अनिलराव



गायकवाड आणि चीफ इंजिनियर सुरवसे साहेब यांच्याशी चर्चा करण्यात आली. यावेळी महामार्गामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांची भूमिका मांडून प्रस्तावित मार्गात पर्यायी बदल करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या चर्चेदरम्यान अनिलराव गायकवाड साहेबांनी पर्यायी अलाइनमेंटचा विचार करण्यासाठी आठ दिवसांची मुदत देण्याचे सांगितले. त्यामुळे ही बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली. या बैठकीला माजी आमदार बाळासाहेब दांगट, बापूशेठ आमले, सूरज वाजगे, बापू कुंभकर, ईश्वर केदारी यांच्यासह जुन्नर तालुक्यातील बाधित शेतकरी उपस्थित होते.

महामार्गाच्या प्रस्तावित मार्गामुळे शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनींचे नुकसान होऊ नये, तसेच त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे अतुल बेनके यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय व्हावा आणि महामार्गासाठी पर्यायी मार्गाचा विचार व्हावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

ग्रामोन्नती मंडळ महाविद्यालयाच्या वतीने क्षयरोगमुक्त अभियान

■ नारायणगाव (दै. संध्या)

'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्याबरोबरच 'टी.बी. मुक्त भारत' या राष्ट्रीय अभियानाला बळकटी देण्याच्या उद्देशाने नारायणगाव येथे भव्य टी.बी. मुक्त भारत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये नारायणगाव परिसरातील विविध शैक्षणिक संस्थांमधील सुमारे २५० एन.सी.सी. छात्रसैनिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून क्षयरोग निर्मूलनाचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव, गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर, नारायणगाव तसेच श्री. अनंतराव इंग्लिश मीडियम स्कूल, नारायणगाव येथील एन.सी.सी. छात्रसैनिकांच्या सहभागातून ही रॅली आयोजित करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडी आणि ग्रामीण रुग्णालय, नारायणगाव यांच्या सहकार्याने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडी येथून रॅलीला सुरुवात करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडी ते कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव या मार्गावर छात्रसैनिकांनी शिस्तबद्ध पद्धतीने रॅली काढली. एन.सी.सी.च्या गणवेशातील शिस्तबद्ध छात्रसैनिकांचा मोठ्या संख्येने सहभाग हे या रॅलीचे प्रमुख आकर्षण ठरले. रॅलीदरम्यान छात्रसैनिकांनी क्षयरोगासंदर्भात विविध जनजागृतीपर घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

क्षयरोगाची लक्षणे ओळखा, वेळेवर तपासणी करा, नियमित उपचार घ्या आणि टी.बी. मुक्त भारतासाठी योगदान द्या, असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला. एन.सी.सी.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ शिस्त, नेतृत्व आणि देशसेवेची भावना निर्माण होत नाही, तर सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशीलता आणि जनजागृती करण्याची जबाबदारीही विकसित केली जाते. याच सामाजिक बांधिलकीचे दर्शन या रॅलीतून घडले.

रॅलीदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्र, वारूळवाडीच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मयुरी पाटील-शेलार यांनी उपस्थित एन.सी.सी. छात्रसैनिकांना 'टी.बी. मुक्त भारत' प्रतिज्ञा दिली. क्षयरोगाबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे, आजाराची लक्षणे समजून घेणे, योग्य वेळी वैद्यकीय उपचार घेणे आणि क्षयरुग्णांविषयी सहानुभूतीपूर्ण व सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे याबाबत या प्रतिज्ञेच्या माध्यमातून छात्रसैनिकांनी सामाजिक बांधिलकी व्यक्त केली. यावेळी डॉ. स्वरूप गिरी, डॉ. संहिता आरोटे, आरोग्य विभागातील कर्मचारी तसेच आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या. आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीमुळे रॅलीला आरोग्यविषयक जनजागृतीची प्रभावी जोड मिळाली.

ग्रामीण रुग्णालय, नारायणगावचे समुपदेशक संदेश थोरात यांनी छात्रसैनिकांना क्षयरोगाची लक्षणे, कारणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर माहिती दिली. दीर्घकाळ खोकला राहणे, सतत किंवा वारंवार ताप येणे, वजनामध्ये घट होणे तसेच खोकताना रक्त येणे यांसारखी लक्षणे आढळल्यास त्याकडे दुर्लक्ष न करता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शरीरामध्ये क्षयरोगाचा संसर्ग झाल्यानंतर योग्य वेळी निदान आणि उपचार न झाल्यास त्याचा इतरांनाही संसर्ग होऊ शकतो, त्यामुळे लक्षणांकडे दुर्लक्ष न करण्याचे आवाहन करण्यात आले. क्षयरोग हा संसर्गजन्य आजार असून संक्रमित व्यक्तीच्या खोकला किंवा शिंकण्यामुळे हवेतून संसर्ग होऊ शकतो. कमकुवत रोगप्रतिकारशक्ती तसेच काही दीर्घकालीन आजारांमुळे संसर्गाचा धोका वाढू शकतो, अशी माहितीही यावेळी देण्यात आली.

क्षयरोगाचे निदान झाल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित औषधोपचार घेणे आणि उपचारांचा पूर्ण कोर्स पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे संदेश थोरात यांनी स्पष्ट केले. औषधोपचार मध्येच बंद केल्यास आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार उपचार पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच क्षयरुग्णांसाठी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध असलेल्या आरोग्यविषयक मदतीची माहितीही छात्रसैनिकांना देण्यात आली. समाजातील नागरिकांनी क्षयरोगाबाबत भीती किंवा गैरसमज न बाळगता योग्य वैद्यकीय उपचार आणि आरोग्य यंत्रणेच्या मदतीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहावे, असा संदेश देण्यात आला.

क्षयरुग्णांनी उपचार घेत असताना तसेच संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे.



खोकताना किंवा शिंकताना तोंड झाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे, घरातील खोली हवेशीर ठेवणे आणि डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करणे याबाबत छात्रसैनिकांना मार्गदर्शन करण्यात आले. क्षयरोगाबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी युवक आणि विद्यार्थी मोठी भूमिका बजावू शकतात. प्रत्येक छात्रसैनिकाने आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात आणि परिसरात क्षयरोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत योग्य माहिती पोहोचवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

एन.सी.सी. छात्रसैनिकांचा सामाजिक आणि राष्ट्रीय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग हा नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता अभियान, आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन तसेच विविध राष्ट्रीय अभियानांमध्ये एन.सी.सी.च्या छात्रसैनिकांकडून महत्त्वपूर्ण योगदान दिले जाते. त्याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या टी.बी. मुक्त भारत जनजागृती रॅलीत सुमारे २५० छात्रसैनिकांनी सहभागी होत 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत' आणि 'टी.बी. मुक्त भारत' या दोन्ही संदेशांना प्रभावीपणे जनमानसापर्यंत पोहोचविले. छात्रसैनिकांनी रॅलीदरम्यान दाखविलेली शिस्त, एकजूट, उत्साह आणि सामाजिक बांधिलकी यामुळे परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. युवकांनी सामाजिक आरोग्यविषयक प्रश्नांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन समाजामध्ये जागृती निर्माण करण्याची गरज या उपक्रमातून अधोरेखित झाली.

या संपूर्ण जनजागृती रॅलीचे नियोजन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगावचे एन.सी.सी. प्रमुख कॅप्टन डॉ. दिलीप शिवणे, गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर, नारायणगावचे एन.सी.सी. प्रमुख रोहित भागवत तसेच श्री. अनंतराव कुलकर्णी, इंग्लिश मीडियम स्कूल, नारायणगावच्या सी.की.व्ही.ओ. संध्या कर्मे यांनी केले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी संबंधित महाविद्यालये, शाळा, आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच एन.सी.सी. छात्रसैनिकांनी परिश्रम घेत. क्षयरोग निर्मूलनासाठी केवळ आरोग्य यंत्रणेच्या प्रयत्नांबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. आजाराची लक्षणे वेळेत ओळखणे, योग्य वेळी तपासणी करणे, उपचारांचा पूर्ण कोर्स घेणे आणि संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक काळजी घेणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एन.सी.सी. छात्रसैनिकांनी रॅलीच्या माध्यमातून दिलेला जनजागृतीचा संदेश केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



दौंड जंक्शनकडे जाणाऱ्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचले; प्रवाशांसह नागरिक त्रस्त

दौंड : दैनिक संध्या

दौंड रेल्वे स्टेशनकडे (जंक्शन) जाणाऱ्या रस्त्यावर पाऊस पडल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी साचत असून, नागरिक व रेल्वे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याच रस्त्यावर रेल्वेचे हॉस्पिटल आहे. तसेच रेल्वेचे तीन ऑफिसेस आहेत. पाऊस पडून तब्बल चार ते पाच दिवस झाले तरी रस्त्यावरील पाण्याचा निचरा झालेला नसल्याचे चित्र आहे. रस्त्यावर पाणी साचल्यामुळे चिखल, खड्डे आणि खराब रस्त्यामुळे दुचाकीस्वार व पादचाऱ्यांना ये-जा करणे अवघड झाले आहे. विशेषतः रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या प्रवाशांना या समस्येचा मोठा फटका बसत आहे. दुचाकी घसरून अपघात होण्याची शक्यताही निर्माण झाली आहे. दरवर्षी पावसाळ्यात या परिसरात अशीच परिस्थिती निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पाण्याचा कायमस्वरूपी निचरा होण्यासाठी योग्य गटार व ड्रेनेज व्यवस्था करावी अशी मागणी रेल्वे प्रवाशांकडून होत आहे. संबंधित प्रशासनाने या ठिकाणी तातडीने पाहणी करून साचलेले पाणी काढावे आणि भविष्यात पाणी साचणार नाही, यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी रेल्वे प्रवाशांकडून मागणी आहे.

ऐन पावसाळ्यात राख गावात टँकर! १२ कोटींचं जलजीवन मिशन फेल?

जेजुरी : दैनिक संध्या

पुरंदर तालुक्यातील राख ग्रामपंचायत हद्दीतील वाड्या-वस्त्यांवर ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईचे सावट आहे. जलस्रोत आटल्याने गोरे-खंडाळे वस्तीसह पडळकर, केर, आल्गुजदरा, कापदरा वस्तीवरील नागरिक टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत. 'हर घर जल' योजनेअंतर्गत राखसाठी मंजूर झालेला १२ कोटी ५७ लाख* रुपयांचा निधी नेमका गेला कुठे? काम अर्धवट ठेवून ठेकेदार आणि अधिकारी पसार झाल्याचा आरोप होत आहे. सध्या पुण्याच्या दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या टँकरने तहान भागवली जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी सरपंच तथा पुरंदर तालुका सरपंच संघटनेच्या अध्यक्षा सीमाताई भुजबळ यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. "पावसाळ्यातही टँकर! राख गावाची तहान, १२ कोटी कुठे गेले? ही स्थिती अनेक गावाची असल्याने आता प्रत्येक गावातील सरपंचांनी एकत्र येऊन आवाज उठवायला हवा! हर घर जल ही योजना नक्की कोणासाठी? ठेकेदारासाठी? शासकीय अधिकाऱ्यांसाठी? की सर्वसामान्य नागरिकांसाठी? पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना आपल्या ग्रामीण भागातील मतदारांकडे पाहायला वेळ नाही का? स्वातंत्र्य मिळून ८० वर्षे पूर्ण होतील, आपण पाणीटंचाई दूर कधी करणार आहात, असे सीमाताई भुजबळ (मा. सरपंच तथा अध्यक्षा - सरपंच संघटना पुरंदर) यांनी सांगितले.

शेतीतील प्रत्यक्ष सहभागाच्या निकषावर मिळणार अधिकृत मान्यता

कवठे येमाई : दैनिक संध्या

राज्यातील महिला शेतकऱ्यांना शासकीय योजनांसह कृषी कर्ज, विमा, कृषी निविष्ठा आणि विस्तार सेवांचा लाभ अधिक सुलभतेने मिळावे, यासाठी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम २०२६ लागू करण्यात आला आहे. त्यानुसार महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देण्यासाठी ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात आले असल्याची माहिती कवठे येमाई विभागाचे कृषी सहायक अधिकारी नंदू जाधव यांनी बोलताना दिली. महिला शेतकऱ्यांना अधिकृत मान्यता, प्रमाणपत्र वितरण आणि त्यांचा अधिकृत डेटाबेस तयार करणे, ही या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. कृषी विभागाच्या संकेतस्थळावरून प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.ग्रामपंचायत किंवा नगरपंचायत क्षेत्रात वास्तव्य असलेल्या १८ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या आणि शेती व्यवसायात कार्यरत असलेल्या महिलांना या प्रमाणपत्रासाठी पात्र ठरविण्यात येणार आहे.अर्ज केल्यानंतर संबंधित अर्ज पुढील नियमित ग्रामसभा किंवा विशेष ग्रामसभेसमोर ठेवण्यात येईल. अर्जदार महिला अधिनियमात नमूद केलेल्या शेतीसंबंधित कामात सहभागी आहे किंवा नाही, याची ग्रामसभा पडताळणी करेल. त्यानंतर अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय घेतला जाईल. अर्ज नाकारल्यास त्याचे कारण लेखी स्वरूपात नमूद करणे आवश्यक राहणार असल्याचे ही नंदू जाधव म्हणाले. ग्रामसभेने महिला शेतकरी म्हणून मान्यता दिल्यानंतर पदनिर्देशित अधिकाऱ्यांकडून १५ दिवसांच्या आत प्रमाणपत्र देण्याची तरतूद करण्यात आली आहे. नगरपंचायत क्षेत्रातील अर्ज संबंधित सर्वसाधारण सभेसमोर ठेवून त्यावर निर्णय घेतला जाणार आहे. या कायद्यानुसार 'शेती' म्हणजे केवळ जमिनीची मालकी नसून पीक लागवड, बियाणे उत्पादन, पशुपालन, मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन, मधमाशी पालन, जलचर पालन, मत्स्यपालन, दुग्ध व्यवसाय, फुलशेती, चारा लागवड, फलोत्पादन, उद्यानशास्त्र, कुक्कुटपालन, रेशीम शेती, गांडूळ खत निर्मिती, वनोपज संकलन व विक्री, शेतीमालावर प्रक्रिया व मूल्यवर्धन, भाजीपाला, वाटाणे किंवा स्थलांतरित स्वरूपात केलेली शेती अथवा शेतमजुरी यांचाही विचार करण्यात आला आहे. शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर महिला शेतकऱ्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या या योगदानाला अधिकृत ओळख मिळावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ त्यांना अधिक सुलभतेने मिळावा, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र हा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे ते म्हणाले.कृषी विभागाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या कालावधीत अधिनियमाची अंमलबजावणी, पात्र महिला शेतकऱ्यांची ओळख, ऑनलाइन अर्जासाठी प्रोत्साहन, प्रशिक्षण आणि जनजागृतीवर विशेष भर देण्यात येत आहे.

मिठाईवर 'एफडीए'ची करडी नजर

पिंपरी : दैनिक संध्या

गणेशोत्सवाच्या पार्श्वभुमीवर मिठाईला मोठी मागणी होती; मात्र भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री होऊ नये म्हणून अन्न व औषध प्रशासनाकडून पिंपरी-चिंचवड शहरात १ ते २४ सप्टेंबरदरम्यान दुकाने व मिठाई विक्रीच्या ४५ ठिकाणी पदार्थांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत ९२६ किलो खाद्यपदार्थ जप्त करण्यात आले. त्यानुसार संबंधितांकडून ४ लाख ६२ हजार ६८३ दंडाची रक्कम वसुल करण्यात आली. गणेशोत्सवात बाप्पाच्या नैवेद्यासाठी मोदक, पेढे, काजू, कतली, मोतीचूर, लाडू, बुंदी, जिलेबी, रसगुल्ला आदी मिठाई पदार्थांना विशेष मागणी असते. या दरम्यान काही मिठाई विक्रेत्यांकडून भेसळयुक्त पदार्थ विक्री केले जातात. या गोष्टीला प्रतिबंध करण्यासाठी एफडीएकडून दूध, पनीर, खवा, तूप इत्यादी पदार्थांची तपासणी करण्यात आली. एफडीएकडून पदार्थांची तपासणी होत असल्याने शहरातील मिठाई दुकानांत सुधारणा पहायला मिळाली.

चावंडच्या प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांचे श्रमदान व दुर्ग संवर्धन

■ नारायणगाव (दै. संध्या)

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची साक्ष देणाऱ्या गड-किल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचा संकल्प रविवारी (दि. २७) जुन्नर तालुक्यातील चावंड किल्ल्यावर प्रत्यक्ष श्रमदानातून साकारला. खासदार डॉ. निलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या गडकोट संवर्धन मोहिमेअंतर्गत चावंड किल्ला अर्थात प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांनी सहभाग घेत स्वच्छता व संवर्धनाच्या कामाला हातभार लावला.

या मोहिमेसाठी खासदार लंके शनिवारी रात्रीच शिवजन्मभूमी जुन्नर येथे दाखल झाले. जुन्नर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे, खासदार असूनही त्यांनी आलिशान हॉटेल किंवा रिसॉर्टमध्ये मुक्काम न करता चावंड येथील प्राथमिक शाळेत रात्रीचा मुक्काम केला. लोकप्रतिनिधीच्या या साधेपणाची परिसरात चर्चा झाली.

रविवारी सकाळपासूनच चावंड परिसरात गडकोट संवर्धन मोहिमेचा उत्साह जाणवत होता. पारंपरिक पद्धतीने खासदार लंके यांची बैलगाडीतून मिरवणूक काढण्यात आली. परिसरातील महिलांच्या लेझीम पथकाने लेझीमच्या तालावर सादरीकरण करीत त्यांचे स्वागत केले. पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीने मोहिमेच्या वातावरणात आणखी रंग भरला.

त्यानंतर खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली हजारो मावळे चावंड किल्ल्यावर पोहोचले. गडाच्या विविध भागांमध्ये स्वच्छता करण्यात आली. गडावरील आवश्यक ठिकाणी डागडुजी आणि संवर्धनाची कामे करण्यात आली. लोकप्रतिनिधींसह नागरिकांनीही प्रत्यक्ष श्रमदान केल्याने गडकोट संवर्धनाचा संदेश केवळ भाषणापुरता न राहता कृतीत उतरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या मोहिमेत पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे, विद्यमान सदस्या माई लांडे, सामाजिक कार्यकर्ते सूरज वाजगे, युवा नेते अमोल लांडे, सरपंच सुमन लांडे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवप्रेमी आणि हजारो मावळे सहभागी झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाशी निगडित गड-किल्ल्यांचे संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून समाजाचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष देवराम लांडे यांनी खासदार लंके यांच्या गडकोट संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले. 'आपला मावळा' संघटनेच्या माध्यमातून या कार्यात सहभागी होऊन गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सामाजिक कार्यकर्ते सूरज वाजगे यांनीही या मोहिमेचे स्वागत केले. माई लांडे यांनी खासदार लंके यांना आपले आदर्श असल्याचे सांगितले, तर सरपंच सुमन लांडे यांनी चावंड परिसराच्या विकासासंदर्भातील विविध मागण्या खासदार लंके यांच्यासमोर मांडल्या.



गडकोट संवर्धन मोहिमेत बोलताना खासदार निलेश लंके यांनी लोकप्रतिनिधी किंवा विशेष व्यक्ती असल्याची भावना बाजूला ठेवून स्वराज्याच्या गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढे येण्याचे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याची साक्ष देणारे हे गड-किल्ले जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. गडांची स्वच्छता आणि संवर्धनाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

गड-किल्ल्यांच्या संवर्धनासाठी शासनाकडेही सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे लंके यांनी सांगितले. गड-किल्ले ही केवळ पर्यटनाची ठिकाणे नसून महाराष्ट्राच्या इतिहासाच्या आणि संस्कृतीच्या जिवंत पाऊलखुणा आहेत. त्यामुळे त्यांचे जतन करण्यासाठी शासनाच्या प्रयत्नांसोबतच समाजाचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चावंड अर्थात प्रसन्नगडावर हजारो मावळ्यांनी केलेले श्रमदान हे गडकोटांप्रती असलेल्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविणारे ठरले. गड स्वच्छ ठेवणे, त्याचे ऐतिहासिक महत्त्व पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे आणि स्वराज्याच्या या ठेव्याचे जतन करणे, या सामूहिक संकल्पाला या मोहिमेतून पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात आले.



पीडीसीसी : उमेदवारी मिळाल्यास विचार करू : आहेर

■ राजगुरुनगर : (दै. संध्या)

आगामी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाकडून उमेदवारी मिळाली, तर निश्चितच निवडणूक लढविण्याबाबत विचार करू, असे प्रतिपादन राजगुरुनगर सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक किरण आहेर यांनी केले.

राजगुरुनगर येथे किरण पतसंस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आनंदी आनंद मंगल कार्यालयात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरण आहेर, अध्यक्ष केदार बैरागी, अनंत भालेकर, ॲड. संदीप भोसले, संतोष काळे, शरद आल्हाट, राजेंद्र वाळुंज, जितेंद्र सरडे, सुहास दाभाडे, मालन घुमटकर, अनुपमा आहेर, व्यवस्थापक शंकर सावंत, वसुली अधिकारी राहुल पिंगळे तसेच सभासद सुरेश कौदरे,किशोर कोरे,रेवण थिगळे,रवींद्र सातकर , सतीश ओसवाल,किशोर मावळे, बंडू जंगम,संजय भागवत,व इतर सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना सांगण्यात आले की, ३१ मार्च २०१६ अखेर संस्थेच्या ठेवी २० कोटी १२ लाख ५८ हजार ४६ रुपये इतक्या होत्या. संस्थेने चालू आर्थिक वर्षात २३ लाख ४० हजार ९४६ रुपयांचा नफा मिळविला आहे. तसेच संस्थेने जाहीर केलेला सहा टक्के लाभांश सभासदांच्या सूचनेनुसार प्रस्तावित नवीन जागेसाठी वळविण्यात आला आहे. किरण आहेर म्हणाले की, संस्थेची सातत्याने होत असलेली प्रगती लक्षात घेता नवीन जागेसाठी संस्था विचाराधीन आहे. नवीन जागेसाठी अधिक निधीची आवश्यकता भासणार असून, त्याहष्टीने नियोजन करण्यात येत आहे. तसेच संचालक ॲड. संदीप भोसले यांच्या सूचनेनुसार तालुक्याच्या ग्रामीण भागात संस्थेची नवीन शाखा सुरू करण्याबाबतही विचार केला जाईल, असे आहेर यांनी सांगितले. दरम्यान आगामी पीडीसीसी बँकेच्या निवडणुकी साठी संचालकाच्या विनंतीला मान देऊन आहेर यांनी उमेदवारी बाबत खुलासा केला.किरण आहेर यांच्या वक्तव्यामुळे त्यांच्या संभाव्य राजकीय भूमिकेबाबत चर्चेला सुरुवात झाली आहे. सभेचे सूत्रसंचालन संतोष काळे यांनी केले तर आभार जितेंद्र सरडे मानले.

"३१ वर्षांपूर्वी लहान स्वरूपात स्थापन झालेल्या किरण पतसंस्थेचा आज मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. संस्थेने केलेली प्रगती निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र, संस्थेची आणखी शाखाविस्तार होणे गरजेचे असून, तालुक्याच्या ग्रामीण भागातील सभासदांना संस्थेच्या सेवा अधिक सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नवीन शाखा सुरू करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.", असे ॲड. संदीप भोसले यांनी सांगितले. अल्पशा भांडवलातून ३१ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या किरण पतसंस्थेने आज केलेली प्रगती पाहून मनस्वी आनंद होत आहे.

सेवा संकल्प अभियानांतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीसाठी विशेष उपक्रम

■ बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ कृषी अधिकारी, सुपे यांच्या कार्यक्षेत्रातील विविध गावांमध्ये महिला शेतकऱ्यांसाठी विशेष प्रमाणपत्र नोंदणी संदर्भात तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी मार्गदर्शन केले.

महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजना व सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. यावेळी पात्र महिला शेतकऱ्यांची माहिती संकलित करून त्यांचे प्रमाणपत्र नोंदणीचे काम करण्यात आले. महिला शेतकऱ्यांनी विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्राचे महत्त्व, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे, नोंदणी प्रक्रिया तसेच प्रमाणपत्राचा विविध शासकीय योजनांमध्ये होणाऱ्या उपयोगाबाबत मंडळ कृषी अधिकारी बापूराव लोदाडे यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमाद्वारे महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना शासकीय योजनांचा लाभ सुलभतेने देण्यासाठी उपयोग होणार आहे. महिला शेतकऱ्यांनीही या विशेष उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रमाणपत्र नोंदणी करून घेतली. या वेळी उपस्थित महिला शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजना व डिजिटल कृषी सेवांचीही माहिती देण्यात आली.



सबनीस विद्यामंदिरातील छात्र सैनिकांना CWS स्कॉलरशिप प्राप्त



■ नारायणगाव : (दै. संध्या)

गुरुवर्य रा.प. सबनीस विद्यामंदिर नारायणगाव मधील एन.सी.सी. द्वितीय वर्षातील छात्रसैनिक वैष्णवी संतोष डोंगरे व अनन्या आनंद शेळके यांना डिजी एनसीसी दिल्ली यांच्याकडून सीडब्ल्यूसी स्कॉलरशिप प्रत्येकी ६ हजार रुपये प्राप्त झाली.

स्कॉलरशिप प्राप्त विद्यार्थ्यांची निवड शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे संपूर्ण देशातून केली जाते. स्कॉलरशिप प्रदान सोहळा ३६ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी. पुणे चे कमांडिंग ऑफिसर कर्नल निशांत मंगरूळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत २१ ऑगस्ट रोजी एन.सी.सी. ऑफिस पुणे येथे पार पडला.

दिघी येथील घरफोडीचा धक्कादायक खुलासा

■ पिंपरी : (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट-३ च्या टीमने अवघ्या १२ तासांत घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणत तब्बल १३ लाख ९८ हजार ९७८ रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत केले आहेत. या प्रकरणातील तपासात धक्कादायक बाब समोर आली असून, चोरी झाल्याचा दावा करण्यात आलेले दागिने प्रत्यक्षात घरातच लपवून ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. दिघी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली समांतर तपास सुरू करण्यात आला.

दररोज बदामांचे सेवन केल्याने झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यास मदत होऊ शकते

■ पुणे (दै. संध्या)

खराब झोपेची गुणवत्ता असलेल्या भारतीय प्रौढांमध्ये करण्यात आलेल्या नवीन रँडमाइज्ड कंट्रोल्ड ट्रायलमध्ये असे आढळून आले आहे की, दररोज बदामांचे सेवन केल्याने जाणवलेल्या झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यास मदत होऊ शकते. झोपेच्या आरोग्याला आधार देण्यासाठी व्यापक, फूड-फर्स्ट दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून बदामांची संभाव्य भूमिका काय असू शकते, याबाबत या निष्कर्षातून नवी माहिती मिळते.

फ्रंटियर्स इन न्यूट्रिशन (देसाई et, २०२६) मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनात झोपेची गुणवत्ता खराब असल्याचे नोंदविणाऱ्या २१-५५ वर्षे वयोगटातील १७५ भारतीय प्रौढांचा समावेश करण्यात आला होता. सहभागींना दररोज ६० ग्रॅम बदाम (अंदाजे ५० बदाम) किंवा तितक्याच कॅलरी असलेला खाकरा, चिवडा आणि क्रॅकर्स यांसारखा नियंत्रण स्नॅक देण्यात आला.

बदामांमध्ये मॅग्नेशियम आणि ट्रिप्टोफॅनसह अनेक पोषक तत्त्वे असतात, जी मज्जासंस्थेच्या सामान्य कार्यासाठी आणि एकूण आरोग्यासाठी जैविकदृष्ट्या महत्त्वाची आहेत. मॅग्नेशियम मज्जासंस्था आणि स्नायूंच्या सामान्य कार्यात महत्त्वाची भूमिका बजावते, तर ट्रिप्टोफॅनचा वापर शरीराकडून सेरोटोनिन आणि मेलाटोनिन तयार करण्यासाठी केला जातो. बदामांमध्ये नैसर्गिकरित्या मेलाटोनिनचे अल्प प्रमाण तसेच आरोग्यासाठी उपयुक्त असंतृप्त चरबी आणि ॲंटिऑक्सिडंट्सही असतात.

दररोज बदामांचे सेवन करणाऱ्या सहभागींनी नियंत्रण स्नॅकचे सेवन करणाऱ्या सहभागींच्या तुलनेत त्यांच्या झोपेच्या अनेक पैलूंमध्ये सुधारणा झाल्याचे नोंदवले. यामध्ये एकूण झोपेच्या गुणवत्तेत सुधारणा, झोपेच्या कार्यक्षमतेत वाढ आणि झोप



लागण्यासाठी लागणाऱ्या वेळेत घट यांचा समावेश होता.


हे निष्कर्ष पोषण आणि झोप यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणाऱ्या व्यापक पुराव्यांमध्ये भर घालतात. तसेच, व्यापक निरोगी जीवनशैलीचा एक भाग म्हणून जाणवलेल्या झोपेच्या गुणवत्तेला आधार देण्यात बदामांची भूमिका असू शकते, असेही हे निष्कर्ष सूचित करतात. या निष्कर्षांवर भाष्य करताना, शीला कृष्णस्वामी, न्यूट्रिशन ॲंड वेलनेस कन्सल्टंट, म्हणाल्या, "झोप हा एकूण आरोग्य आणि कल्याणाचा महत्त्वाचा भाग आहे आणि निरोगी जीवनशैलीचा एक भाग म्हणून पोषणाचीही भूमिका असू शकते. या अभ्यासातील निष्कर्ष उत्साहवर्धक आहेत, कारण झोपेची गुणवत्ता खराब असलेल्या आणि दररोज बदामांचे सेवन करणाऱ्या प्रौढांनी त्यांच्या झोपेच्या अनुभवात सुधारणा झाल्याचे नोंदवले. यामध्ये झोपेची गुणवत्ता, झोपेची कार्यक्षमता आणि झोप लागण्यासाठी लागणाऱ्या वेळेतील सुधारणा यांचा समावेश आहे." "तसेच, उदयोन्मुख पुरावे असे सूचित करतात की असंतृप्त चरबी आणि झोपेला आधार देणाऱ्या संयुगांनी समृद्ध असलेले वनस्पतीजन्य पदार्थ झोपेच्या गुणवत्तेला आधार देऊ शकतात आणि बदामांमध्ये इतर पोषक तत्त्वांसोबत असंतृप्त चरबीही असतात, ज्यामुळे त्यांच्या एकूण पोषक प्रोफाइलमध्ये भर पडते. बदामांमध्ये मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि व्हिटॅमिन ई ही सूक्ष्म पोषक तत्त्वे असतात, जी स्नायूंना विश्रांती देणे आणि न्यूरोएंडोक्राइन नियमनाद्वारे झोपेला आधार देण्यासाठी ओळखली जातात. वस्तुनिष्ठ झोपेच्या मोजमापांवर होणारे परिणाम समजून घेण्यासाठी अधिक संशोधनाची आवश्यकता असली तरी, बदामांचा रोजच्या निरोगी आहाराच्या सवयींमध्ये साधा आणि पोषक तत्त्वांनी समृद्ध असा समावेश केला जाऊ शकतो." हे निष्कर्ष पोषण आणि झोप यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणाऱ्या व्यापक पुराव्यांमध्ये भर घालतात. तसेच, जाणवलेली झोपेची गुणवत्ता आणि वस्तुनिष्ठपणे मोजले जाणारे झोपेचे शरीरशास्त्रीय पैलू यांच्यातील फरक स्पष्टपणे समजून घेण्याचे महत्त्वही अधोरेखित करतात.




दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६

पुणे शहर व जिल्हा

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



श्री वीर गोगादेव सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने बाल मेळावा

पुणे : दैनिक संध्या

भवानी पेठ हरकानगर पूना कॉलेज येथील श्री वीर गोगादेव सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने लहान मुलांसाठी बाल मेळावा आयोजित करण्यात आला होता. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा आणि भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन श्री वीर गोगादेव सार्वजनिक गणेश मंडळाचे अध्यक्ष महेश सुनील निंदानिया यांनी केले होते यावेळी प्रमुख पाहुणे नगरसेवक रफिक भाई शेख, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष रशीद शेख, सामाजिक कार्यकर्ता शफिक भाई शेख, मनीष सोलंकी, वीरेंद्र घोसरे, मनीष तांदरे, रवी वाघेला, हेमंत सालार, बलराज सालार, आशिष सारसर, रणजीत सुसगोहर आदि उपस्थित होते. या कार्यक्रमाला विविध समाजातील महिला पुरुष बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमंत थोरले बाजीराव पेशव्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन

पुणे : दैनिक संध्या

श्री देवदेवेश्वर संस्थान पर्वती व कोथरूड यांच्या वतीने अजिंक्य योद्धा श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांच्या ३२६ व्या जयंतीनिमित्त पर्वतीवरील त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त असलेल्या अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी आणि प्रमुख विश्वस्त सुधीर पंडित यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विश्वस्त रमेश भागवत, पुष्करसिंह पेशवा, जगन्नाथ लडकत उपस्थित होते. विजय जोशी म्हणाले, महाराष्ट्र सरकारच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या अमृत या संस्थेमार्फत श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करण्यात येत आहे. राज्याच्या अनेक जिल्ह्यांत थोरले बाजीराव पोहोचले, याचा आनंद आहे. लोकांना बाजीराव कोण होते, याची माहिती व्हावी आणि त्यांचे कर्तृत्व जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे, यासाठी यापुढेही कार्यरत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. जगन्नाथ लडकत म्हणाले, बाजीरावांच्या शब्दकोशात 'आराम ' हा शब्दच नव्हता. 'विश्रांती 'आणि 'भोग' हे शब्दही त्यांच्या शब्दकोशात नव्हते. त्यांच्या शब्दकोशात 'महापराक्रम' हा शब्द होता. त्याचप्रमाणे जगाच्या इतिहासात बाजीराव हे अपराजित शूर योद्धा म्हणून प्रसिद्ध झाले. यावेळी रमेश भागवत, सुधीर पंडित यांनी मनोगत व्यक्त केले. पुष्करसिंह पेशवा यांनी आभार मानले.

गर्भलिंग निदान प्रकरण: आरोपी अण्णासाहेब गिरीला पुन्हा अटक

यवत : दैनिक संध्या

गर्भलिंग निदान प्रकरणातील अटकेत असलेला मुख्य आरोपी अण्णासाहेब आप्पा गिरी (वय ४२ वर्ष, रा. केडगाव स्टेशन, ता. दौंड) याला यवत पोलिसांनी बलात्काराच्या एका अन्य गुन्ह्यात पुन्हा अटक केली आहे. न्यायालयाने आरोपीला २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, यवत पोलीस ठाण्यात एका पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी अण्णासाहेब गिरीविरुद्ध भा.न्या.सं. २०२३ चे कलम ६९, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी गिरी हा आधीच गर्भलिंग निदान प्रकरणात न्यायिक कोठडीत (ज्युडिशियल कस्टडी) येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे बंदिस्त होता.या नवीन गुन्ह्याच्या तपासासाठी यवत पोलिसांनी माननीय न्यायालयाकडून 'प्रोडक्शन वॉरंट' मिळवले. त्यानंतर २४ सप्टेंबर २०२६ रोजी आरोपीला येरवडा कारागृहातून ताब्यात घेऊन या गुन्ह्यात अधिकृतपणे अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने गुन्ह्याच्या सखोल तपासासाठी त्याला २८ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कस्टडी मंजूर केली आहे.ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. संदीपसिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. गणेश बिरादार, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, सहायक पोलीस निरीक्षक नितीन अतकरे आणि त्यांच्या पथकाने केली.

शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या

डॉ. बुधाजीराव मुळीक यांची मागणी; मित्रपरिवाराकडून ८६ व्या वर्षात पदार्पणानिमित्त सत्कार

■ पुणे (दै. संध्या)



"मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांत पावसाच्या अनियमिततेमुळे शेती संकटात सापडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची गरज आहे. तसेच शेतकऱ्याला कायद्याचे संरक्षण, शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव दिला पाहिजे," अशी मागणी ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बुधाजीराव मुळीक यांनी केली. डॉ. मुळीक यांनी २७ सप्टेंबर रोजी वयाची ८७ वर्षे पूर्ण करून ८६व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त भूमाता परिवार आणि मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळ, हवामान बदल, शेतीचे प्रश्न आणि शेतकरी धोरणांबाबत भूमिका मांडली.

भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. सुरेश पवार, डॉ. एम. एस. जाधव, प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण तरडे, ॲड. केदार सोमण, सामाजिक कार्यकर्ते राज देशमुख, माजी महापौर कमल व्यवहारे, महिपतराव फडतरे, ॲड. कमल सावंत, डॉ. श्यामराव भगत, सुरेश कोते, यशवंत खैरे, हेमंत सूर्यवंशी, सुरेश खोपडे यांच्यासह कृषी, राजकीय व प्रशासनातील अनेक मान्यवरांनी डॉ. मुळीक यांना शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले. अमेरिकेच्या कृषी खात्यात प्रधान अर्थशास्त्रज्ञ पदावर काम करणाऱ्या त्यांच्या कन्या डॉ. क्रांती मुळीक या वडिलांच्या वाढदिवसानिमित्त आवर्जून उपस्थित होत्या.

डॉ. बुधाजीराव मुळीक म्हणाले, "दुष्काळी भागातील प्रत्येक कुटुंबातील किमान दोन व्यक्तींना दररोज ३०० रुपये मजुरी देऊन त्यांच्या शेतातच जलसंधारण आणि शेतीची कामे उपलब्ध करून द्यावीत. त्यामुळे शेतकऱ्याच्या कुटुंबाला उत्पन्न मिळेल आणि त्याच्या शेतातील पाण्याच्या उपलब्धतेतही वाढ होईल. त्यातून शेतकऱ्याचा सन्मानही कायम राहील. शेती ही केवळ उपजीविकेचे साधन नसून, देशाचा प्राण आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनासाठी कायद्याचे संरक्षण आणि उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाल्याशिवाय शेती व शेतकरी समृद्ध होणार नाही. शेतकरी समृद्ध झाला तरच देश समृद्ध होईल."

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची कर्जे माफ करून बँका, पतसंस्था आणि खासगी सावकारांची सक्तीची वसुली थांबवावी, अशी मागणी करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या उच्च, तांत्रिक आणि वैद्यकीय शिक्षणाचा तसेच वसतिगृहाचा खर्च सरकारने करावा. पशुधनासाठी पाणी व चाऱ्याच्या छावण्या तातडीने सुरू कराव्यात, असेही त्यांनी सांगितले. युवा पिढीने कृत्रिम जीवन जगण्यापेक्षा निसर्गाशी नाळ जोडून नैसर्गिक जीवन जगावे. टेक्नॉलॉजी आणि शिक्षणाचा वापर शेतीतील कष्ट कमी करण्यासाठी, तण-खत व्यवस्थापनासाठी आणि गरजू लोकांच्या सेवेसाठी करा, असा संदेश त्यांनी दिला.

पूर्वी मराठवाडा हा धान्याचे कोठार मानला जात होता. मात्र, संकरित बियाणे, नगदी पिकांचा वाढता आग्रह आणि गायरानांचे कमी होणे यामुळे शेती व पशुधनासमोर संकट निर्माण झाले आहे. रासायनिक शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी होत असल्याने शहरातील जैविक कचऱ्यापासून सेंद्रिय खते तयार करून ती शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावीत. शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष उत्पादनाच्या नुकसानीवर आधारित कायदेशीर भरपाईची व्यवस्था महाराष्ट्रात निर्माण करण्याची गरज आहे. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि शुद्ध अन्न हे मूलभूत हक्क आहेत आणि ते शेतकरीच उपलब्ध करून देतो, असे त्यांनी नमूद केले.

प्रवीण तरडे व राज देशमुख यांनी डॉ. बुधाजीराव मुळीक गेल्या ६० वर्षांपासून शेती आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी वेगवेगळे प्रयोग करीत असून, त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले. डॉ. मुळीक यांनी आपले संपूर्ण आयुष्य शेतीमधील प्रयोगांसाठी वाहून घेतले आहे. वयाच्या पंच्याऐंशीमध्येही त्यांचे प्रयोग आणि शेतकऱ्यांसाठीचा लढा सुरु आहे. येत्या काळातही त्यांच्याकडून शेतकऱ्यांना व शेती क्षेत्राला मार्गदर्शन होत राहावे, असे मत व्यक्त केले.

कर्नलवाडी ग्रामपंचायतीचा कौतुकास्पद उपक्रम; शालेय विद्यार्थ्यांचे १०० टक्के आधार प्रमाणीकरण पूर्ण

■ नीरा (दै. संध्या)

शासकीय योजना, शिष्यवृत्ती तसेच शालेय संचमान्यतेसाठी विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण आवश्यक असताना, कर्नलवाडी (ता. पुरंदर) ग्रामपंचायतीने पुढाकार घेत गावातील विद्यार्थ्यांसाठी थेट गावातच आधार प्रमाणीकरण व अद्ययावतीकरणाची सुविधा उपलब्ध करून दिली. ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे कर्नलवाडी हद्दीतील चार जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील ५० विद्यार्थ्यांचे १०० टक्के आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे.

कर्नलवाडी गावठाण, झिरिपवस्ती, कोंडेवाडी आणि ब्राह्मणदरा येथील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ग्रामपंचायतीच्या वतीने दोन दिवसीय विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामविकास अधिकारी रेवणनाथ होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले. आधार कार्डवरील नावातील चुका, जन्मतारखेतील विसंगती, बायोमेट्रिक अद्ययावत नसणे तसेच नवीन आधार नोंदणी अशा विविध बाबींची पूर्तता या शिबिरात करण्यात आली.

ग्रामीण भागातील पालकांना आधारमधील दुरुस्ती किंवा बायोमेट्रिक अद्ययावतीकरणासाठी तालुका अथवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागत होते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने संबंधित यंत्रणांच्या सहकार्याने गावातच सुविधा उपलब्ध करून दिली. विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्याने शालेय शिक्षण विभागाच्या 'सरल' आणि 'यू-डायस प्लस' प्रणालीवरील नोंदी अद्ययावत करण्यासही मदत झाली आहे.

या उपक्रमासाठी सरपंच सुवर्णा महानवर, उपसरपंच स्वप्नाली निगडे, सदस्य नंदकुमार निगडे, अनिल निगडे, ग्रामविकास अधिकारी रेवणनाथ होळकर, कर्मचारी शशिकांत निगडे, सिद्धेश निगडे तसेच मुख्याध्यापक संजय निगडे, प्रवीण निगडे, अनिल नेवसे, वैशाली निगडे, मंगेश राऊत, सुवर्णा नेवसे, दशरथ गायकवाड, वर्षा पवार यांनी परिश्रम घेतले. "शासकीय योजना, शिष्यवृत्ती आणि पोषण आहार यांपासून गावातील एकही विद्यार्थी वंचित राहू नये, यासाठी ग्रामपंचायतीने गावातच ही सुविधा उपलब्ध करून दिली. मुख्याध्यापक, शिक्षक आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांचे १०० टक्के आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्यात यश आले," अशी माहिती सरपंच सुवर्णा महानवर यांनी दिली.



पद्मश्री डॉ. कोल्हे दाम्पत्याकडून दुधभाते नेत्रालयाच्या आधुनिक नेत्रसेवेचे कौतुक

■ पुणे (दै. संध्या)



पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरला सदिच्छा भेट देत नेत्रालयातील अत्याधुनिक तपासणी व उपचार सुविधांची माहिती घेतली. ग्रामीण व गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या 'फिरता नेत्र दवाखाना' (मोबाईल आय क्लिनिक) उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या भेटीदरम्यान डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांची आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सविस्तर नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीसाठी वापरले जाणारे अद्ययावत तंत्रज्ञान, उपचारपद्धती तसेच रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची त्यांनी माहिती घेतली. नेत्रालयातील विविध विभाग, वैद्यकीय उपकरणे, स्वच्छता व्यवस्था आणि रुग्णसेवेची कार्यपद्धतीचीही त्यांनी पाहणी केली.

नेत्रालयाचे संचालक व प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांनी कोल्हे दाम्पत्याचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच डोळ्यांचे आरोग्य आणि विविध नेत्रविकारांविषयी माहिती देणारे त्यांचे स्वलिखित 'नेत्रकोष' हे पुस्तक त्यांना भेट दिले.

डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून 'फिरता नेत्र दवाखाना' उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून आतापर्यंत एक हजारांहून अधिक मोफत नेत्रतपासणी शिबिरे घेण्यात आली असून, ग्रामीण भागातील दहा हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत नेत्रआरोग्य सेवा पोहोचविणाऱ्या या उपक्रमाबद्दल कोल्हे दाम्पत्याने समाधान व्यक्त केले.

"वाढती लोकसंख्या आणि प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नेत्ररुग्णांना तपासणीपासून उपचारांपर्यंतच्या आधुनिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणे आवश्यक आहे. डॉ. दुधभाते नेत्रालयात अशा स्वरूपाच्या सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध आहेत," असे डॉ. रवींद्र कोल्हे यांनी सांगितले.

डॉ. स्मिता कोल्हे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत रुग्णकेंद्रित दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा असल्याचे नमूद केले. डॉ. अनिल दुधभाते यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबरोबरच नेत्रालयाच्या व्यवस्थापनाचेही त्यांनी कौतुक केले. डॉक्टर आणि कर्मचारी रुग्णांशी आपुलकीने व संवेदनशीलतेने संवाद साधत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आरोग्यसेवा आणि सामाजिक कार्याला आयुष्य समर्पित केलेल्या कोल्हे दाम्पत्याची भेट आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शब्दांमुळे ग्रामीण व गरजू घटकांपर्यंत नेत्रसेवा अधिक व्यापकपणे पोहोचविण्याची प्रेरणा मिळाली," असे डॉ. अनिल दुधभाते यांनी सांगितले.

यावेळी साहित्यिक गिरीश वसेकर, नितीन पाटील, राजेंद्र शेळके, शीतल हिराळकर आणि अंकुर दुबे उपस्थित होते.

संरक्षित शेतीच्या अनुदानासाठी शेतकरी आक्रमक; एनएचबी कार्यालयावर मोर्चा

५० टक्के अनुदान पूर्ववत करण्यासह जाचक अटी रद्द करण्याची मागणी

■ पुणे (दै. संध्या)

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या (एनएचबी) अंतर्गत संरक्षित शेतीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात ५० टक्क्यांवरून ३५ टक्के कपात करण्यात आल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. अनुदानातील कपात तसेच नव्या मार्गदर्शक तत्त्वांमधील जाचक अटी-शर्ती रद्द करून पूर्वीप्रमाणे ५० टक्के अनुदान सुरू करावे, या मागणीसाठी शेतकरी, फूल उत्पादक आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी पुणे येथील राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढला.

दिल्ली येथे १५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळाच्या कार्यालयासमोर आणि १६ सप्टेंबर रोजी कृषी भवनासमोर आंदोलन केल्यानंतर शेतकरी संघटना आणि हरितगृह उद्योगातील प्रतिनिधींनी महाराष्ट्रात आंदोलनाची सुरुवात केली. पवना संस्कृती एफपीसी, इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन (इग्मा), महाराष्ट्र फूल उत्पादक संघ आणि पुणे फूल उत्पादक कंपनीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. आंदोलकांनी एनएचबीच्या उपसंचालकांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

या आंदोलनात मावळ तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर, फूल उत्पादक संघाचे सुमारे ४०० शेतकरी, इग्माचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, राष्ट्रीय सहसचिव तथा महाराष्ट्र अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे, नितीन जगताप, रोशन पिंगळे, जयदीप ननवरे यांच्यासह विविध पदाधिकारी सहभागी झाले होते.

अनुदान कपातीमुळे हरितगृह उद्योग अडचणीत

संरक्षित शेतीमध्ये पॉलीहाऊस आणि शेडनेट हाऊस उभारण्यासाठी शेतकरी स्वतःची जमीन, भांडवल तसेच बँक कर्जाची मोठी गुंतवणूक करतात. अशा परिस्थितीत अनुदान ५० टक्क्यांवरून ३५ टक्के करण्यात आल्याने शेतकऱ्यांवरील आर्थिक भार वाढला आहे. त्याचबरोबर अनुदानासाठी लागू करण्यात आलेल्या विविध अटींमुळे नवीन प्रकल्प उभारण्यास शेतकरी आणि उद्योजकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे.

यापूर्वी मंजूर झालेल्या काही प्रकल्पांचे अनुदानही प्रलंबित असल्याने शेतकरी



तसेच हरितगृह उभारणीशी संबंधित उद्योग अडचणीत आले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा पुनर्विचार करून प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशी मागणी करण्यात आली.

दिल्लीतील दोन दिवसांच्या आंदोलनानंतरही अपेक्षित निर्णय न झाल्याने देशातील विविध राज्यांमध्ये आंदोलन करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यात एनएचबीच्या विभागीय कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. देशातील सुमारे दहा राज्यांमध्ये अशाच प्रकारची आंदोलने करण्यात आल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

धोरणांमध्ये बदल करण्यापूर्वी प्रक्रियेत असलेल्या प्रकल्पांचा आणि शेतकऱ्यांच्या गुंतवणुकीचा विचार करणे आवश्यक आहे. नवीन नियमांमुळे आधीच गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांवर अनपेक्षित आर्थिक भार पडू नये, जुन्या नियमांनुसार सुरू झालेल्या प्रकल्पांना संरक्षण मिळावे आणि फूल निर्यातीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी प्रगतिशील शेतकरी मुकुंद ठाकर यांनी केली.

केंद्र सरकार आणि राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाने शेतकरी आणि देशहिताच्या दृष्टिकोनातून नव्या मार्गदर्शक तत्त्वांचा पुनर्विचार करावा, तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशी मागणीही त्यांनी केली.

पॉलीहाऊस आणि शेडनेट हाऊस उभारणीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीच्या खरेदीवर शेतकऱ्यांना १८ टक्के जीएसटी भरावा लागतो. शेतकऱ्यांकडे जीएसटी क्रमांक नसल्याने या कराचा परतावा मिळत नाही. परिणामी, कागदोपत्री मिळणाऱ्या अनुदानाच्या तुलनेत प्रत्यक्ष आर्थिक लाभ कमी होत असल्याचा दावा आंदोलकांनी केला.

"अनुदानातील कपात आणि जाचक अटींमुळे संरक्षित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे अनुदान पूर्वीप्रमाणे ५० टक्के करावे आणि पॉलीहाऊस व शेडनेट हाऊससाठी लागणाऱ्या साधनसामग्रीवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करावा," अशी मागणी इग्माचे राष्ट्रीय सहसचिव तेजोमय घाडगे यांनी केली.

आंदोलकांनी राज्य सरकारनेही या प्रश्नात हस्तक्षेप करून केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठपुरावा करावा आणि संरक्षित शेती क्षेत्रातील शेतकरी व उद्योगांना दिलासा मिळेल, यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली.

शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या

१. २१ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेले सुधारित मार्गदर्शक तत्त्वांचे परिपत्रक मागे घ्यावे.
२. पॉलीहाऊस आणि शेडनेट हाऊससाठीचे आर्थिक सहाय्य पूर्वीप्रमाणे ५० टक्के करावे.
३. पॉलीहाऊस व शेडनेट हाऊस उभारणीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करावा.
४. सुधारित नियम लागू होण्यापूर्वी सादर केलेल्या अर्जांवर तसेच जीओसी परवानगी मिळालेल्या प्रकल्पांवर जुन्या नियमांनुसार कार्यवाही करावी.
५. 'एक कुटुंब–एक लाभार्थी' या अटीचा पुनर्विचार करून स्वतंत्र कुटुंबव्यवस्था असलेल्या दोन भावांच्या स्वतंत्र प्रकल्पांना स्वतंत्रपणे लाभ देण्याची तरतूद करावी.
६. दहा हजार रुपयांपेक्षा अधिक निवृत्तीवेतनाशी संबंधित पात्रता अटीचा पुनर्विचार करून शेती करणाऱ्या पात्र निवृत्त जवान तसेच केंद्र व राज्य शासनातील निवृत्त कर्मचाऱ्यांना योजनेपासून अनावश्यकपणे वंचित ठेवू नये.